जिल्ह्यातील निकडीच्या प्रश्नांना वाचा फोडणारे एकमेव दैनिक

नवा मराठा

फोन-२४१४१४१, २४१७७७७

भाडोत्री म्हणून वर्षानुवर्ष जगण्यापेक्षा निर्भिड म्हणून क्षणभर जगण्यात जीवनाचे खरे सार्थक आहे. - कै.आचार्य गुंदेचा

email - navamaratha@gmail.com

# शहरात विनापरवाना बांधकाम केल्याप्रकरणी महानगरपालिकेकडून गुन्हा दाखल

नगर – महानगरपालिकेची कोणतीही अधिकृत परवानगी न घेता आणि प्रशासनाने वारंवार नोटिसा बजावूनही अनधिकृत बांधकाम सुरूच ठेवल्याप्रकरणी सर्जेपुरा भागातील एका व्यक्तीवर गुन्हा दाखल करण्यात आला आहे. झेंडीगेट प्रभाग समितीचे प्रभारी अधिकारी विश्वास भिंगारदिवे यांनी याप्रकरणी पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे.

मुदस्सर युनुस शेख (रा. कॅम्प कौलारू, सर्जेपुरा) असे गुन्हा दाखल झालेल्या आरोपीचे नाव आहे. सर्जेपुरा येथील समशेर मशीद परिसरातील एका जागेवर मुदस्सर युनुस शेख हे पक्क्या स्वरूपाचे बांधकाम करत असल्याची तक्रार प्राप्त झाली होती. या तक्रारीनुसार महापालिकेच्या पथकाने प्रत्यक्ष स्थळ पाहणी केली असता, सुमारे १३.८० बाय ९ मीटर क्षेत्रात विनापरवाना बांधकाम सुरू असल्याचे निदर्शनास आले. प्रशासनाने संबंधित व्यक्तीला बांधकामाची परवानगी दाखवण्यास सांगितले, मात्र त्यांच्याकडे कोणतेही कायदेशीर कागदपत्रे उपलब्ध नव्हती.

यानंतर महापालिकेने संबंधितांना बांधकाम थांबवण्याच्या सूचना दिल्या आणि महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमानुसार नोटीस बजावली. मात्र, या नोटिशीला केराची टोपली दाखवत आरोपीने बांधकाम सुरूच ठेवले. नुकत्याच केलेल्या पाहणीत इमारतीच्या स्लॅबचे काम सुरू असल्याचे आढळले. अखेर शासकीय आदेशाचे उल्लंघन केल्याप्रकरणी मुदस्सर युनुस शेख यांच्याविरुद्ध महाराष्ट्र प्रादेशिक आणि नगररचना अधिनियमातील कलम ५२, ५३ व ५४ अन्वये गुन्हा नोंदवण्यात आला आहे. या प्रकरणाचा पुढील तपास पोलीस हवालदार गंगावणे करत आहेत.

# शहरात प्रवेश करताच कचऱ्याने स्वागत; अहिल्यानगरची प्रतिमा मलीन, ढिग तात्काळ हटवा अन्यथा १४ फेब्रुवारी रोजी मनपा व जिल्हाधिकारी कार्यालयाच्या प्रवेशद्वारात कचरा टाकणार

नगर – शहरात प्रवेश करताना चोहीबाजूंनी साचलेल्या कचऱ्याच्या ढिगांमुळे शहराची प्रतिमा पूर्णतः मलीन होत असल्याचा आरोप जागतिक पर्यावरण विकास सरकार संघटनेचे राष्ट्रीय अध्यक्ष गोरक्षनाथ गवते यांनी केला आहे. शहराच्या दर्शनी भागात असलेले हे कचऱ्याचे ढीग तात्काळ उचलण्यात यावेत, अशी मागणी त्यांनी जिल्हाधिकारी व महापालिका आयुक्तांकडे निवेदनाद्वारे केली आहे.

शहरातील बुऱ्हाणनगर व भिंगार परिसरातून अहिल्यानगरकडे येणाऱ्या रस्त्यांच्या कडेला मोठ्या प्रमाणात कचरा साचलेला आहे. त्याचप्रमाणे एमआयडीसीकडून शहरात येताना तसेच महामार्गाच्या कडेला देखील कचऱ्याचे ढीग दिसून येतात. परिणामी, शहरात प्रवेश करतानाच नागरिक व पाहुण्यांना घाणीचे दर्शन घडत असून, यामुळे अहिल्यानगरची स्वच्छ शहर म्हणून असलेली ओळख धोक्यात आली आहे.

एकीकडे शहराला स्वच्छतेसाठी विविध पुरस्कार मिळत असताना, दुसरीकडे प्रवेशद्वारावरच कचऱ्याचे ढिग दिसणे ही अत्यंत दुर्दैवी बाब असल्याचे गवते यांनी सांगितले. हा कचरा तात्काळ उचलण्यात न आल्यास १४ फेब्रुवारी रोजी जिल्हाधिकारी कार्यालय व महापालिका कार्यालयाच्या प्रवेशद्वारात प्रतिकात्मक स्वरूपात कचरा टाकून आंदोलन केले जाईल, असा इशाराही त्यांनी दिला.



बुऱ्हाणनगर व भिंगार परिसरातून अहिल्यानगरकडे येणाऱ्या रस्त्यांच्या कडेला मोठ्या प्रमाणात साचलेला कचरा.

संघटनेच्या बैठकीत बोलताना गोरक्षनाथ गवते यांनी वाढत्या प्रदूषणावर तीव्र चिंता व्यक्त केली. मुंबई, दिल्लीसह अनेक महानगरांमध्ये प्रदूषणाने भयंकर स्वरूप धारण केले आहे. स्वातंत्र्याच्या वेळी भारतात सुमारे ४२ टक्के वनक्षेत्र होते, आज ते केवळ ०.४ टयांवर आले आहे, ही बाब अत्यंत चिंताजनक आहे, असे त्यांनी सांगितले. झाडतोड थांबवली नाही, तर भविष्यात मानवासह सर्व सजीवांचे अस्तित्व धोक्यात येईल, असा इशाराही त्यांनी दिला. शासनाने या गंभीर प्रश्नांकडे गांभीर्याने लक्ष न दिल्यास राज्यव्यापी आंदोलन छेडण्यात येईल, असा स्पष्ट इशाराही त्यांनी दिला.

पर्यावरण रक्षण ही केवळ सरकारची जबाबदारी नसून प्रत्येक नागरिकाने आपल्या परिसरातील झाडांचे संरक्षण करणे अत्यावश्यक आहे. झाडे वाचली तरच स्वच्छ हवा, शुद्ध ऑक्सिजन आणि निरोगी जीवन शक्य आहे. दररोज हजारो–लाखो झाडांची कत्तल होत आहे, ही कत्तल कोणाच्या आशीर्वादाने सुरू आहे आणि ती कधी थांबणार? असा प्रश्न गवते यांनी उपस्थित केला.

या बैठकीस पोपटराव पटारे, निलेश साठे, विकास भीटे, प्रकाश भिटे, सचिन गवते, किरण गवते, महेश मंडलिक, सिताराम मंडलिक, गोविंद गडाख, दत्ता देवकर, मनोज देशमाने, नवनाथ गवते, अरुण गवते, गणेश भिटे, भाऊसाहेब मोरे, शिवाजी पालवे, अंबादास कांडेकर, पोपटराव महारनवर आदी उपस्थित होते.

कचऱ्यामुळे प्राणीजीवन धोक्यात : शहरात साचलेल्या कचऱ्यामुळे पर्यावरणातील अनेक सजीवांवर गंभीर परिणाम होत आहे. रस्त्यालगत असलेल्या कचऱ्यातील प्लास्टिक खाल्ल्याने गायी, कुत्रे यांसारख्या प्राण्यांच्या पोटात प्लास्टिक साचत असून त्यांना गंभीर आजारांना सामोरे जावे लागत आहे. याशिवाय, कचऱ्यामुळे परिसरात दुर्गंधी पसरली असून मोठ्या प्रमाणात प्रदूषण निर्माण झाले आहे. अहिल्यानगरच्या दर्शनी भागात असलेला हा कचरा जणू येणाऱ्या–जाणाऱ्या नागरिकांचे स्वागतच करत असल्याची उपरोधिक टीका गवते यांनी केली.

## सौर ऊर्जा प्रकल्पातून कॉपर केबलची चोरी

नगर – जिल्ह्यात चोरीच्या घटनांचे सत्र सुरूच असून, नगर तालुक्यातील जेऊर परिसरातील एका सौर ऊर्जा प्रकल्पातून अज्ञात चोरट्याने ४० हजार रुपये किमतीची ८२ मीटर लांबीची कॉपर केबल चोरून नेल्याची घटना उघडकीस आली आहे. या प्रकरणी एमआयडीसी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

जेऊर येथील घुरुडी डोंगरावर एका सौर ऊर्जा प्रकल्पाचे काम सुरू आहे. २७ जानेवारी ते ३१ जानेवारी या कालावधीत चोरट्याने संधी साधून कंपनीच्या परिसरातील सुमारे ८२ मीटर लांबीची हिरव्या पोपटी रंगाची कॉपर केबल चोरून नेली. या चोरीला गेलेल्या केबलची किंमत अंदाजे ४० हजार रुपये इतकी आहे.

या प्रकरणी ज्ञानदेव भाऊसाहेब पायमोडे (वय ४६, रा. टाकळी ढोकेश्वर, ता. पारनेर) यांनी एमआयडीसी पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे. त्यांच्या फिर्यादीवरून पोलिसांनी अज्ञात चोरट्याविरुद्ध भारतीय न्याय संहितेच्या कलम ३०३(२) प्रमाणे गुन्हा नोंदवला आहे. एमआयडीसी पोलीस ठाण्याचे सहाय्यक पोलीस निरीक्षक चौधरी यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस हवालदार पालवे या प्रकरणाचा पुढील तपास करत आहेत.

# महापालिका आयुक्तांची डीप क्लीनची घोषणा हवेतच; ठिक–ठिकाणी कचऱ्याचे ढिगारे : सफाई कागदावरच

नगर – महापालिकेने शहरातील कचरा संकलनाचा ठेका दिल्यानंतर महापालिका आयुक्त यशवंत डांगे यांनी शहरात डीप क्लीन करण्याचे घोषीत करून कार्यवाही सुरु केली होती. नव्याचे नऊ दिवस या म्हणी प्रमाणे डीप क्लीनची मोहीम चार ते पाच दिवस शहरात राबविण्यात आली. मात्र आता पुन्हा परिस्थिती जैसे थे झालेली आहे. त्यामुळे नागरिकांमधून मनपाच्या कारभावर नाराजी व्यक्त केली जात आहे.

मागील वर्षभरात नगर शहरात कचऱ्याचा प्रश्न मोठ्या प्रमाणात नागरिकांना भेडसावला. यामुळे नगरकरांचे आरोग्यही धोक्यात आले होते. हा प्रश्न सोडविण्यात मनपा प्रशासनाला सुमारे पाच महिन्यांपेक्षा जास्त कालावधी लागला. त्यामुळे स्वच्छ व सुंदर शहराला अस्वच्छतेचे ग्रहण लागले होते. ते काहा अंशी अद्यापही कायम आहे. महापालिकेने शहरातील कचरा संकलनाचा ठेका दिल्यानंतर मनपा आयुक्तांनी शहर डीप क्लीन करण्याची घोषणा केली. या घोषनेमुळे सर्वांना शहर स्वच्छ व सुंदर होईल, अशी अपेक्षा वाटली. मात्र ही घोषणा नव्याचे नऊ दिवस या म्हणी प्रमाणेच राहिली. ही स्वच्छता मोहीम शहरात अवघे पाच ते सहा दिवस चालली. त्यानंतर शहरातील परिस्थिती जैसे थेच राहिलेली आहे. अनेक भागात अद्यापही केरकचऱ्याचे ढिगारे दिसून येत आहे. त्यामुळे नागरिकांचे आरोग्य धोक्यात आलेले आहे.

आयुक्तांनी डीप क्लीनची घोषणा केल्यानंतर मोजक्याच भागात भेटी दिलेल्या आहेत. आता त्यांनी सर्वच भागाला भेटी देऊन स्वच्छता कर्मचारी किती कामकाज करतात याचा आढावा, घ्यावा, अशी मागणी नागरिकांमधून होत आहे.

**पदाधिकाऱ्यांकडून अपेक्षा :** महापालिकेची निवडणूक झालेली असून ६ फेब्रुवारीला आता महापौरपदभार स्वीकारणार आहे. त्यानंतर प्रशासक राज संपून पदाधिकारी राज येणार आहे. प्रशासकीय राजकडून नागरिकांना अनेक अपेक्षा होत्या. मात्र त्या फेल ठरलेल्या आहेत. आता पदाधिकाऱ्यांनी नगरकरांना स्वच्छतेसह सुरळीत पाणी पुरवठा, मोकाट जनावरे व कुत्र्यांपासून सुटका व्हावी, अशी अपेक्षा आहे.

**संकलन न झलेल्या काळाचा कर माफ करा :** शहरात कचरा संकलन करणाऱ्या ठेका संपल्यानंतर शहरातील नागरिकांना कचऱ्याच्या प्रश्न मोठ्या प्रमाणात भेडसावलेला आहे. सुमारे चार ते पाच महिने हा प्रश्न कायम होता. या काळातील घनकचऱ्याचा कर नागरिकांचा माफ करावा, अशी मागणी होत आहे. मनपा प्रशासनाच्या चुकीमुळे लवकर ठेका झालेला नाही. त्यामुळे नागरिकांना कचऱ्याच्या समस्येला तोंड द्यावे लागलेले आहे. तसेच नागरिकांच्या आरोग्याचा प्रश्न निर्माण झालेला होता. त्यामुळे या काळातील घनकचऱ्याचा कर माफ करावा, अशी मागणी नागरिकांमधून होत आहे. या प्रश्नावर विद्यमान पदाधिकाऱ्यांनी लक्ष घालावे, अशी मागणी होत आहे.

## पोलिस हवालदार निलंबित

(पान १ वरुन)

प्राप्त झाली होती. इतकेच नव्हे तर साळवी यांचे या कत्तलखाना चालकांशी आर्थिक लागेबांधे असल्याची धक्कादायक माहिती समोर आली होती.

या प्रकरणाची गांभीर्याने दखल घेत पोलीस अधीक्षकांनी चौकशीचे आदेश दिले होते. गेल्या एका वर्षात ममदापूर येथे प्राणी संरक्षण अधिनियमान्वये दाखल झालेल्या गुन्ह्यांचा आढावा घेतला असता, साळवी हे या गुन्ह्यातील आरोपींच्या नियमित संपर्कात असल्याचे निष्पन्न झाले. अवैध व्यवसायाचे समूळ उच्चाटन करणे आवश्यक असताना, साळवी यांनी कर्तव्यात जाणीवपूर्वक कसूर केल्याचे तपासात स्पष्ट झाले. पोलीस हवालदार साळवी यांचे हे वर्तन अत्यंत बेजबाबदार आणि शिस्तबाह्य असून, यामुळे पोलीस दलाची जनमानसातील प्रतिमा मलीन झाली आहे. या गंभीर प्रकारामुळे त्यांना शासकीय सेवेतून निलंबित करण्यात आले आहे.

# नगर कल्याण रोडवर पिकअपच्या धडकेत दुचाकीस्वाराचा मृत्यू

नगर – भरधाव वेगातील पिकअप वाहनाने दुचाकीला पाठीमागून जोरदार धडक दिल्याने झालेल्या अपघातात दुचाकीस्वाराचा जागीच मृत्यू झाल्याची घटना नगर–कल्याण महामार्गावर नेप्ती शिवारात घडली आहे. शंकर बाबुराव आचार्य (रा. आंबेडकर चौक, बोल्हेगाव) असे मयताचे नाव आहे. या प्रकरणी नगर तालुका पोलीस ठाण्यात अज्ञात पिक अप चालकाविरुद्ध गुन्हा नोंदवण्यात आला आहे.

याबाबत मयताचा मुलगा आर्यन शंकर आचार्य (रा. आंबेडकर चौक, बोल्हेगाव) यांनी ३ फेब्रुवारी रोजी फिर्याद दिली आहे. मयत शंकर आचार्य हे स्वयंपाकाचे काम करत होते. ते ३१ जानेवारी रोजी सकाळी १०.३० च्या सुमारास स्वयंपाकाचे कामावरून त्यांच्या दुचाकीवरून येत असताना नेप्ती फाटा येथे सागर भेळ सेंटर समोर त्यांच्या पाठीमागून भरधाव वेगात आलेल्या पिक अप ने त्यांना जोरात धडक दिली. धडक इतकी भीषण होती की त्यांचा गंभीर दुखापत होऊन जागीच मृत्यू झाला. अपघात केल्यानंतर अज्ञात चालक जखमीला मदत न करता किंवा पोलिसांना माहिती न देता वाहन घेऊन पसार झाला.

या प्रकरणी पोलिसांनी पिकअपच्या अज्ञात चालकाविरुद्ध भारतीय न्याय संहिता आणि मोटार वाहन कायद्याच्या विविध कलमान्वये गुन्हा दाखल केला आहे. सहाय्यक पोलीस निरीक्षक प्रल्हाद गिते यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस हवालदार जायभाय या प्रकरणाचा पुढील तपास करत आहेत.

# गुगलवर लिंकला रेटिंग देऊन टास्क पूर्ण करण्याच्या नावाखाली नगरमधील शिक्षिकेची साडेपाच लाखांची ऑनलाईन फसवणूक

नगर – गुगलवर लिंकला रेटिंग देऊन नफा मिळवून देण्याचे आमिष दाखवून सायबर भामट्यांनी एका शिक्षिकेची तब्बल ५ लाख ४५ हजार ९६८ रुपयांची ऑनलाईन आर्थिक फसवणूक केल्याची घटना ३ जानेवारी ते ५ जानेवारी या कालावधीत घडली आहे. याप्रकरणी ३ फेब्रुवारीला नगरच्या सायबर पोलीस ठाण्यात फसवणुकीचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

याबाबत आगरकर मळा परिसरात राहणाऱ्या ३९ वर्षीय शिक्षिकेने फिर्याद दिली आहे. फिर्यादी शिक्षिकेला टेलिग्राम आयडीवरून संपर्क करण्यात आला होता. आरोपींनी त्यांना गुगलवर लिंकला रेटिंग देण्याचे टास्क दिले आणि त्यातून मोठा नफा मिळेल असे आमिष दाखवले. सुरुवातीला विश्वास संपादन केल्यानंतर, टास्कमधून बाहेर पडण्यासाठी काही स्टेप्स फॉलो करण्यास सांगण्यात आले. मात्र, या स्टेप्स चुकीच्या असल्याचे सांगून तांत्रिक कारणास्तव टेलिग्राम ग्रुपमधील सदस्यांची बँक खाती फ्रीज झाल्याची भीती आरोपींनी दाखवली.

फ्रीज झालेली खाती पुन्हा सुरू करण्यासाठी आणि गुंतवलेले पैसे परत मिळवण्यासाठी फिर्यादीला आणखी पैसे भरण्यास भाग पाडले गेले. अशा प्रकारे वेळोवेळी एकूण ५ लाख ४५ हजार ९६८ रुपये बँक खात्यात पाठविण्यास सांगून त्यांची फसवणूक करण्यात आली. फसवणूक झाल्याचे लक्षात येताच पीडितेने सायबर पोलीस ठाण्यात धाव घेतली. पोलिसांनी टेलिग्राम आयडी धारक आणि संबंधित बँक खातेधारकांविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे. सायबर पोलीस ठाण्याचे प्रभारी अधिकारी सागर ढिकले यांच्या मार्गदर्शनाखाली पुढील तपास सुरू आहे.

नागरिकांनी अशा कोणत्याही अनोळखी लिंक किंवा टास्कला बळी पडू नये, असे आवाहन पोलिसांनी केले आहे.

# सौ. गाडेंच्या महापौर तर जाधव यांच्या उपमहापौर निवडीला राजकीय कंगोरे

अहिल्यानगर महानगरपालिकेत राष्ट्रवादी–भाजप युतीला निर्विवाद बहुमत असल्याने महापौर पदावर सौ. ज्योती गाडे यांची तर उपमहापौरपदी धनंजय जाधव यांची बिनविरोध निवड पक्ष पातळीवर निश्चित झाली. त्यावर ६ फेब्रुवारीला अधिकृत शिक्कामोर्तब होईल. यापूर्वीच्या महापौर पदाच्या निवडणुका वादग्रस्त झाल्याचे नगरकरांनी अनुभवले, पण ते राजकारण तो गोंधळ यावेळी निर्विवाद बहुमतामुळे टळला. युतीच्या पक्षश्रेष्ठींना ही निवड बिनविरोध करणे सहजासहजी शक्य झाले, ही वास्तवता असली तरी या निवडीला अनेक कंगोरे आहेत. हा राजकीयदृष्ट्या सोयीचा भाग असला तरी यामुळे उद्भवणारे महापालिकेच्या कामकाजाचे आणि नगरसेवकांच्या दृष्टीने गैरसोयीचे प्रश्न अनुत्तरितच राहतात. सव्वा वर्षाच्या मुदतीची टर्म करून पाच वर्षात चार ओबीसी महिलांना महापौर पदाची संधी देणार. वरकरणी हा निर्णय राजकीयदृष्ट्या सोयीचा भासत असल्याने इच्छुकांना सोयीचा भासेल, परंतु या अल्पशा कालावधीत महापौर–उपमहापौर यांना अधिकार वापरताना तारेवरची कसरत करावी लागेल. सव्वा वर्षातील पहिले पाच–सहा महिने हार–तुरे घेण्यात आणि कामकाजाची माहिती घेण्यातच जातील त्यानंतर कोठे काम सुरू झाले की, यांची मुदत संपणार आणि दुसरा महापौर–उपमहापौर सत्तारूढ होणार. परिणामी हे अधिकार पद नामधारी बनवून सत्तेचा केंद्रबिंदू महापालिका प्रशासन, पालकमंत्री आणि आमदारांकडे सरकणार, मग महानगरपालिकेवर प्रशासक असला काय आणि लोकनियुक्त नगरसेवक, यात विशेष फरक तो काय पडणार? ही केवळ राजकीय सोय झाली. पाच वर्षात चार नावांच्या मागे ‘माजी महापौर’ हे बिरुदावल चिकटणार, पण कर्तृत्व सिद्ध करण्याची संधी हुकणार, त्याचे काय? तीच अवस्था स्वीकृत नगरसेवकांची होणार. सव्वा वर्षात त्यांच्या नावांच्या मागे ’माजी’ लागणार आणि सार्वत्रिक निवडणुकीत हक्काचे कार्यकर्ते मिळणार, हाच राजकीय लाभ एवढेच असेल तर सरकार सहा वर्षाच्या मुदतीचा कायदाच का करत नाही. कायदा केला तर कोर्टात पितळ उघडे पडेल म्हणून राज्यकर्त्यांनी हा खुश्कीचा शॉर्टकट शोधलेला दिसतो.

### आमदारांची खेळी

सौ. ज्योती गाडे यांची महापौरपदी निवड होईल, अशी त्यांची राजकीय पार्श्वभूमी आणि या निवडणुकीत जे शह–काटशह देण्याचे राजकारणाची अटकळ लक्षात घेता राजकीय निरीक्षकांनी जो अंदाज बांधला होता, तो खरा ठरला. या निवडीला केडगावचे राजकारण जसे जबाबदार ठरते तसेच ज्योती गाडे या माजी आमदार स्व. कर्डिले यांच्या कन्या आहेत. यापूर्वी त्यांची एक मुलगी उपमहापौर तर दुसरी मुलगी नगरसेवक झाली. यावेळी तिसऱ्या कन्येलाही महापौर पदाची संधी बहाल करण्यात आली. विशेष म्हणजे आमदार संग्राम जगताप यांच्या त्या मेहुणी आहेत. त्यात राष्ट्रवादीला सर्वाधिक जागा आहेत, त्यामुळे सौ. गाडे यांनाच महापौरपदाची प्रथम संधी मिळणार, हा सर्वसाधारण होरा होताच, तो खरा ठरला. हे पद ओबीसी महिलाकरिता आरक्षित असल्याने ते ‘ओरिजिनल ओबीसी’ला मिळावे, अशी मागणी भाजपचे माजी शहराध्यक्ष ॲड. अभय आगरकर यांनी केली होती. माध्यमात तशा बातम्या आल्या होत्या, पण कायदा हा कायदा असतो. ओबीसीत अनेक जातींचा समावेश आहे. त्यात कुणबीसुद्धा आहे, पण ‘ओरिजिनल ओबीसी’ काय प्रकार, हे अनाकलनीय वाटत ओबीसी म्हणजे विशिष्ट जात नव्हे म्हणून कदाचित पालकमंत्री विखे यांनी कानावर हात ठेवले असावे, पण ना. विखे यांनी शिर्डीत ‘ओरिजनल ओबीसी’च्या आडून गोंदकरांची उमेदवारी नाकारली होती, मग नगरच्या वॉर्ड क्रमांक २ मध्ये महेश तवले आणि ११ मध्ये सौ. डागवाले यांना कोणत्या प्रवर्गातून उमेदवारी होती, याचे संशोधन झाले तर कायद्याच्या पळवाटीची त्रुटी लक्षात येईल. एवढेच काय, ज्योती गाडे राहतात वॉर्ड ४ मध्ये आणि उमेदवारी केली ३ मध्ये आणि निवडून येऊन महापौर झाल्या. अर्थात हे कायदासंमत आहे. त्यावर आक्षेप घेता येणार नाही, पण ज्या वॉर्डात युतीला उमेदवार देता आला नाही, त्या वॉर्डातील रहिवासी ज्योती गाडे यांना महापौरपदाची संधी मिळाली आहे, ही आमदारांची खेळी मानावी लागेल.

### पालकमंत्र्यांचा डाव

पालकमंत्री विखे आणि आमदार संग्राम जगताप हे भाजप आणि राष्ट्रवादीचे म्हणजे वेगळ्या पक्षाचे राजकारण करत असले तरी ते एकमेकांना पूरक असते. तरीसुद्धा ते त्यांच्या सोयीचे डावपेच टाकतात, तसा पालकमंत्री विखे यांनी उपमहापौरपदी भाजपकडून धनंजय जाधव यांच्या नावावर शिक्कामोर्तब करून अप्रत्यक्षरित्या आमदारांना शहच दिला, कारण जगताप– जाधव यांच्यातील राजकीय संघर्ष गेली अनेक वर्ष नगरकरांनी अनुभवलेला आहे. स्व. छबूराव पैलवान, माजी नगराध्यक्ष स्व. कृष्णाभाऊ जाधव यांनी जगताप यांना वेळोवेळी विरोध केल्याच्या इतिहास सर्वश्रुत आहे. धनंजय जाधव कधी थोरात यांच्या बगलेत तर कधी विखेंच्या साथीला राहून आपले राजकारण टिकवून आहेत. ते भाजपकडून विधानपरिषदेच्या पदवीधर मतदारसंघातून इच्छुक होते, त्यावेळी त्यांची संधी हुकली पण आता ते उपमहापौर झाल्यामुळे राजकीय मेरिट वाढले, ही कदाचित त्यांची पुढच्या राजकीय संधीचे पहिले यशस्वी पाऊल मानावे लागेल. **– रामदास ढमाले**

## पैसे मागितल्याच्या रागातून मारहाण; हाताचे बोट मोडले

नगर – उसने दिलेले पैसे परत मागितल्याचा राग मनात धरून एका तरुणाला लाकडी काठीने आणि लाथाबुक्क्यांनी बेदम मारहाण केल्याची घटना १ फेब्रुवारी रोजी दुपारी १.१५ वाजण्याच्या सुमारास नगर तालुक्यातील वाळकी येथे घडली. या मारहाणीत फिर्यादी तरुणाच्या हाताचे बोट मोडले असून, झटापटीत सोन्याची अंगठी गहाळ झाली आहे. याप्रकरणी नगर तालुका पोलीस ठाण्यात आरोपीविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

याबाबत लक्ष्मण अनिल कासार (वय २४, रा. वाळकी, ता.नगर) याने फिर्याद दिली आहे. लक्ष्मण याने सोनु उर्फ अशोक गुंड (रा. वाळकी) याला काही पैसे उसने दिले होते. वाळकी बसस्थानकाजवळील शिवगॅरेजसमोर लक्ष्मणने हे पैसे परत मागितले. याचा राग आल्याने आरोपी सोनु याने लक्ष्मणला अश्लील शिवीगाळ करण्यास सुरुवात केली. वादाचे रूपांतर हाणामारीत झाले. आरोपीने लक्ष्मणच्या डाव्या हाताची करंगळी पकडून ती जोरात पिरगळली, ज्यामुळे ती मोडून गंभीर दुखापत झाली.

इतक्यावरच न थांबता आरोपीने लाकडी काठीने लक्ष्मणच्या पाठीवर प्रहार करत लाथाबुक्क्यांनी मारहाण केली. या गोंधळात फिर्यादीच्या हातातील सोन्याची अंगठी कोठेतरी पडून गहाळ झाली आहे. घटनेनंतर जखमी अवस्थेत लक्ष्मणने दवाखान्यात उपचार घेतले आणि त्यानंतर पोलीस ठाण्यात धाव घेतली. या तक्रारीवरून नगर तालुका पोलिसांनी आरोपी सोनु उर्फ अशोक गुंड याच्या विरोधात गुन्हा नोंदवला आहे. या प्रकरणाचा पुढील तपास पोलीस अंमलदार लाड करत आहेत.

## सुनील देशपांडे यांचे हृदयविकाराने निधन



नगर – नगर कॉलेजचे प्रा. सुनील वामन देशपांडे (वय ६७) यांचे ३ फेब्रुवारी रोजी हृदयविकाराने निधन झाले. त्यांच्या पार्थिवावर नालेगाव अमरधाम येथे अंत्यसंस्कार करण्यात आले. त्यांच्या मागे पत्नी, २ मुले, सुना, नातवंडे असा परिवार आहे. सौरभ, शंतनू देशपांडे यांचे ते वडील होत.

## बबन फुलसौंदर यांचे वृद्धापकाळाने निधन



नगर – बुरुडगाव रोड फुलसौंदर मळा येथील प्रगतशील शेतकरी बबन फकीरा फुलसौंदर (वय ८९) यांचे ४ फेब्रुवारी रोजी वृद्धापकाळाने निधन झाले. त्यांच्या पार्थिवावर नालेगाव अमरधाम येथे अंत्यसंस्कार करण्यात आले.

त्यांच्या मागे २ मुले, १ मुलगी, सुना, जावई, नातवंडे असा परिवार आहे. शहर बँकेतील मॅनेजर मच्छिंद्र व शिवाजी फुलसौंदर यांचे ते वडील तर माजी महापौर भगवान फुलसौंदर यांचे चुलते होत.

मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक सुभाष चंदनमल गुंदेचा यांनी नवा मराठा मुद्रणालय, आचार्य गुंदेचा चौक, अहिल्यानगर येथे हे पत्र छापून येथेच प्रसिद्ध केले.

# गृहिणी

## आरोग्य

### वारंवार सर्दी होत असेल तर

हवामानातील बदल अनेकदा हंगामी संसर्ग आणि आजार घेऊन येतात, ज्यामध्ये सर्दी, खोकला आणि ताप यांचा समावेश आहे. हवामान बदलताच अनेक लोकांना सर्दी आणि खोकला होतो, तर काहींना डोकेदुखी आणि ताप येतो. जर तुम्हाला दर दुसऱ्या दिवशी सर्दी आणि खोकला येत असेल, हंगामी संसर्गाचा सहज परिणाम होतो आणि ऋतू बदलताच सर्दी होण्याची शक्यता असते, तर त्याची अनेक कारणे असू शकतात. प्रथम, तुमची रोगप्रतिकारक शक्ती मजबूत करण्यासाठी चांगली झोप घ्या. संतुलित आहार घ्या. तुमच्या रोगप्रतिकारक पेशी मजबूत करण्यासाठी तुमच्या आहारात फळे, भाज्या आणि प्रथिने समाविष्ट करा. बाहेरून आल्यानंतर हात धुवा आणि शिंकताना किंवा खोकताना तोंड झाकून घ्या. योग्य कपडे घाला. थंड हवामानात, तुमचे शरीर झाकून ठेवा. प्रदूषणात तुमचा चेहरा मास्कने झाकून ठेवा. रक्ताभिसरण सुधारण्यासाठी आणि तुमची रोगप्रतिकारक शक्ती मजबूत करण्यासाठी दररोज फिरायला जा. कमकुवत प्रतिकारशक्ती देखील वारंवार सर्दी होण्याचे एक कारण असू शकते. झोपेचा अभाव, अयोग्य आहार, निर्जलीकरण आणि जास्त ताण यामुळे रोगप्रतिकारक शक्ती कमकुवत होते.

## पाककला

### गुळाची खीर

**साहित्य :** अर्धा कप तांदूळ, १५० ग्रॅम गूळ, १ लिटर फुल-क्रीम दूध, काजू, बदाम, मनुका, हिरव्या वेलची

**कृती :** सर्वात आधी तांदूळ स्वच्छ धुवा आणि भिजवा. नंतर, एका मोठ्या, जाड तळाच्या भांड्यात दूध उकळायला आणा, आच कमी ठेवा. बदाम आणि काजूचे लहान तुकडे करा.स्वच्छ सुती कापडाने मनुके स्वच्छ पुसून टाका. आता गूळ किसून घ्या. यामुळे ते सहज विरघळण्यास मदत होईल. तसेच दुधाला उकळी आल्यावर, भिजवलेले तांदूळ पाण्यातून काढून टाका आणि घाला. तांदूळ शिजेपर्यंत शिजवा. खीर वारंवार ढवळत तपासा, कारण ती तळाशी खूप लवकर चिकटते. आता, एका भांड्यात गूळ ठेवा आणि त्यात अर्धा कप पाणी घाला व ते विरघळेपर्यंत उकळवा. गूळ पूर्णपणे विरघळल्यावर, ते चाळणीतून गाळून शिजवलेल्या खीरमध्ये घाला. खीर जास्त शिजवू नका, कारण यामुळे दूध दही होऊ शकते. खीरमध्ये चिरलेले काजू, आणि बदाम, मनुका घाला. तयार खीर एका बाउल मध्ये काढा.

## वास्तू

### पैशाचे पाकीट संबंधी नियम

* आर्थिक परिस्थिती मजबूत करण्यासाठी वास्तुनुसार पर्समध्ये या वस्तू ठेवाव्यात. तुमच्या पर्समध्ये चिमूटभर अक्षत (लाल रंगाचा तांदूळ) ठेवल्याने शुक्र ग्रह मजबूत होतो आणि अनावश्यक खर्च टाळता येतो. * तुमच्या पर्समध्ये मोहित पिंपळाचे पान ठेवल्याने पैशाचा प्रवाह स्थिर राहतो.

* वास्तूनुसार पुरुषांसाठी तपकिरी किंवा काळी पर्स आणि महिलांसाठी लाल किंवा सोनेरी पर्स शुभ असते.

* रात्री झोपताना तुमची पर्स उशाजवळ ठेवू नये.

## सौंदर्य

अर्धा कप पाण्यात दोन चमचे कोरफडीचे जेल मिसळा आणि चांगले मिसळा. हे हलके आणि हायड्रेटिंग टोनर त्वचेची जळजळकमी करते. ते लावल्याने त्वचा लगेच मऊ आणि थंड वाटते.

## सल्ला

उकळत्या पाण्यात छोले घाला आणि त्यांना ५ मिनिटे जास्त आचेवर उकळू द्या. गॅस बंद करा आणि भांडे झाकून ठेवा. एक ते दोन तासांनंतर, छोले शिजवण्यासाठी तयार आहे. तुम्ही ते लगेच बनवण्यासाठी वापरू शकता.

**संकलक : ॲड. सौ. पूजा गुंदेचा**

# दैनिक पंचांग

गुरुवार, दि. ५ फेब्रुवारी २०२६

**संकष्ट चतुर्थी, शके १९४७ विश्वावसुनामसंवत्सर, माघ कृष्णपक्ष, उत्तरा २२।५७, सूर्योदय ०६ वा. ४४ मि. सूर्यास्त ०५ वा. ३३ मि.**

### राशिभविष्य

**मेष** : मैदानी खेळात सहभागी व्हाल. शारीरिकदृष्ट्या तंदुरुस्त राहाल.

**वृषभ** : स्पर्धात्मक परीक्षेला आत्मविश्वासाने सामोरे जा. सामाजिक कार्यात सहभागी व्हाल.

**मिथुन** : जोडीदाराला समजावून घ्याल. तुमचे व्यक्तिमत्त्व आज बहरेल. सहनशीलतेने कार्यरत राहाल.

**कर्क** : मानसिक ताण शक्य. कठोर बोलणे वा सहकाऱ्यांशी गैरवर्तणूक महागात पडेल.

**सिंह** : प्रिय व्यक्तीविषयी शंका घेऊ नका. आर्थिक परिस्थिती समाधानकारक राहील.

**कन्या** : आर्थिक गुंतवणुकीतून योग्य तो मोबदला मिळेल. नात्यामध्ये कटुता टाळा. स्थावर मालमत्तेत गुंतवणूक कराल.

**तूळ** : वाहने व उपकरणे जपून वापरावीत. जोडीदाराबरोबर रोमँटिक क्षण अनुभवाल.

**वृश्चिक** : कार्यालयाच्या ठिकाणी रागावर नियंत्रण ठेवा. सहकाऱ्यांशी आपुलकीने वागा. अति खाणे टाळा

**धनु** : शारीरिक व्यायाम अथवा योगाचे महत्त्व लक्षात घ्या. घरातील ज्येष्ठांशी प्रेमाने बोला. अति प्रमाणात प्रवास करावा लागेल.


**मकर** : आरोग्य उत्तम राहील. सकारात्मक ऊर्जेने कार्यरत राहाल. आर्थिक स्थितीमध्ये बदल घडतील.

**कुंभ** : अनावश्यक गोष्टींचा विचार करू नका. मानसिक बळ वाढेल. नोकरीत अनुकूल स्थिती राहील.

**मीन** : कर्जाऊ रक्कम देणे टाळावे. व्यवसायात भागीदारी तूर्तास नको. वैवाहिक आयुष्यात थोडे निवांत क्षण अनुभवाल.

**संकलक : ॲड. सौ. पूजा गुंदेचा**

## शब्दगंध क्र. ७३६० सौ.शैलजा कुलकर्णी



शब्दगंध क्र. ७३५९ चे उत्तर



**आडवे शब्द :-** १) भारताचे एक माजी हंगामी पंतप्रधान ६) एक रंग; एक रत्न ७) दुप्पट; नवीन खोदलेली विहीर ८) भीमाने मारलेला एक राक्षस १०) ज्याअर्थी; 'तर'चा जोडीदार ११) एक केसाळ जंगली प्राणी; अस्वल १२) कधीही न चुकणारे; अचूक १४) मस्ती; जोर १६) आठवड्यातील कोणताही दिवस १७) फुलातील गोड रस; मकरंद १९) फळातील रसाळ भाग; गर २१)मुस्लिम वर्षाचा नववा महिना २३) पाण्यात राहणारा एक हिंस्र प्राणी २५) मिळून; बरोबर २६) कितीही मिळाले तरी तृप्त न होणारा

**उभे शब्द :-** १) फुलांचा राजा २) मोठ्याने मारलेली ३) शंभर हजार; लक्ष ४) महाराष्ट्रातील एक जिल्हा ५) बायको; पत्नी; जाया ९) पाण्यात राहणारा एक हिंस्र प्राणी १०) अनेक वस्तू एकत्र करणे १३) देवांचे एक पेय १५) जाणे; प्रस्थान करणे १८) हिंमत; शक्ती; उग्र वास २०) मिठाचे चव २२) उत्तर भारतातील एक समाज २४) फळातील रसाळ भाग

# * * * * * * मुलांचे विश्व * * * * * *

: संकलक : ॲड.सौ. पूजा गुंदेचा

**सुविचार** : ज्याला बुद्धी नाही त्याला शास्त्राचा काहीच फायदा नाही.

## मुलांसाठी भन्नाट माहिती ज्ञानरंजन

### कसोटी सामने नेहमी पांढऱ्या जर्सीमध्ये का खेळले जातात?

क्रिकेट हा खेळ आहे सर्वांनाच आवडतो. तसेच प्रत्येक रस्त्यावर आणि परिसरात तुम्हाला मुले क्रिकेट खेळताना दिसतील. जर तुम्ही शनिवार आणि रविवारी उद्यानात गेलात तर तुम्हाला प्रौढांनाही क्रिकेट खेळताना दिसेल. मुख्य गोष्ट अशी आहे की क्रिकेट लोकांच्या रक्तात आहे आणि ते हा खेळ खूप आनंदाने खेळतात आणि पाहतात. तसेच तुम्ही सामान्य कपड्यांमध्ये क्रिकेट खेळला असेल, परंतु जेव्हा जेव्हा तुम्ही खेळाडूंना खेळताना पाहिले असेल तेव्हा त्यांनी ते नेहमीच त्यांच्या जर्सीमध्ये पाहिले असेल. प्रत्येक देशाची स्वतःची जर्सी असते, जी वेगवेगळ्या रंगांची असू शकते, परंतु कसोटी सामने पांढऱ्या जर्सीमध्ये खेळले जातात. असे का आहे? यामागील कारण आपण जाणून घेऊ या.

कसोटी सामन्यात पांढरी जर्सी घालणे पूर्णपणे व्यावहारिक आहे कारण, दिवसभर उन्हात खेळताना, पांढरा रंग सूर्यप्रकाश शोषून घेण्यास आणि त्याचे अधिक परावर्तन करण्यास मदत करतो. यामुळे खेळाडूंना जास्त वेळ मैदानावर राहता येते.

### बाह्यस्वरुप

अनेक वर्षांपूर्वीची गोष्ट आहे. एक मोठा राजवाडा होता आणि एक ऋषी त्याच्या दाराशी आला. त्याने द्वारपालाला आत जाऊन राजाला सांगायला सांगितले की त्याचा भाऊ त्याला भेटायला आला आहे. द्वारपालाला आश्चर्य वाटू लागले की ऋषींच्या वेशात आलेला हा ऋषी कोण आहे जो त्याचा भाऊ असल्याचा दावा करत होता.

मग द्वारपालाला वाटले की तो कदाचित संन्यास घेतलेला एखादा दूरचा नातेवाईक असेल. द्वारपाल आत गेला आणि बातमी सांगितली, त्यानंतर राजा हसला आणि ऋषींना आत पाठवण्याचा आदेश दिला. ऋषींनी विचारले, भाऊ, कसे आहात?

राजाने उत्तर दिले, मी ठीक आहे. मला सांगा, कसे आहात?

ऋषींनी राजाला सांगितले, मी ज्या राजवाड्यात राहतो तो खूप जुना आहे. तो कोणत्याही क्षणी कोसळू शकतो. माझे ३२ नोकरही एक एक करून निघून गेले आहे. हे ऐकून राजाने ऋषीला १० सोन्याची नाणी देण्याचा आदेश दिला. पण ऋषी म्हणाले की १० सोन्याची नाणी खूप कमी आहे.

हे ऐकून राजा म्हणाला, माझ्याकडे सध्या एवढेच आहे, तुम्ही ते करून घेऊ शकता. यानंतर, ऋषी निघून गेले.

ऋषींना पाहून मंत्र्यांच्या मनात अनेक प्रश्न निर्माण झाले. त्यांनी राजाला विचारले, आम्हाला माहिती आहे, तुम्हाला भाऊ नाही, मग तुम्ही ऋषींना इतके मोठे बक्षीस का दिले?

राजाने उत्तर दिले,

जीर्ण राजवाड्याचा अर्थ त्याचा जुना शरीर होता आणि ३२ नोकरांचा अर्थ त्याचा ३२ दात होता.

त्याने मला असे वाटायला लावले की त्याने राजवाड्यात पाऊल ठेवताच माझा खजिना संपला आहे. कारण मी त्याला फक्त दहा सोन्याची नाणी देत होतो, जेव्हा मी त्याला सोन्यात तोलण्यास सक्षम होतो. म्हणून राजाने घोषणा केली की तो त्याला त्याचा सल्लागार म्हणून नियुक्त करेल.

तात्पर्य : एखाद्या व्यक्तीच्या बाह्य स्वरूपावरून त्याच्या बुद्धिमत्तेचे मूल्यांकन करू नये.

## जीवन का अमृत (भाग १)



कृपया सतगुरु में विश्वास रखकर, इस प्रक्रिया की ओर से ध्यान हटाएँ । उसकी इच्छा और खुशी के आगे पूर्ण आत्मसमर्पण करना, अंतर्मुख होने का और शुद्ध आनंद के मंडलों की यात्रा करने का सबसे पक्का और सुरक्षित तरीका है ।

***

१४३. मुझे खुशी है कि आप प्रेम से भजन-सिमरन को समर्पित हैं, जिसके फलस्वरूप आप विभिन्न रंगों की ज्योति देखते हैं और दायीं ओर से आती पवित्र शब्द धुन को सुनते हैं, जो कि सतगुरु की दया से और तेज़ हो रही है

एक बार आपको देहाभास से पूर्ण रूप से ऊपर आने की दात मिली, जो कि आमतौर से आपको मुश्किल लगता है। अंतर में ‛आँख’ का दिखाई देना, जो कि सामान्य आँख से २-३ गुणा बड़ी हो, शुभ है, क्योंकि यह सतगुरु की आँख है। इसके मध्य में आप प्रेम से अपनी आंतरिक दृष्टि को टिकाएँ और पवित्र सिद्ध नामों का जाप करें, ताकि सतगुरु की दया से, समय आने पर यह फूटकर आगे का रास्ता दे दे।

### सामान्य आँख

यह संभव है कि आप सतगुरु के पूरे आकार के लुभावने, नूरी स्वरूप के दर्शन की दात पाएँ, जो कि आमतौर से इस अनुभव के बाद आती है । कृपया इस स्वरूप की असलियत की परख करने के लिए पाँच नामों का जाप करें, क्योंकि कभी-कभी काल की शक्ति भी इसी भेष में आ जाती है और पवित्र नाम, आंतरिक स्वरूप की असलियत की पहचान करने का पक्का तरीका है। यदि यह स्वरूप जाप के सामने ठहरता है, तो पक्की तौर से जान लो कि यह दोस्ताना है और आगे की आंतरिक यात्रा में आपकी सहायता करेगा ।

आप जो बाँसुरी की आवाज़ पहले सुन रहे थे, वह बहुत अच्छी है; इसको एकाग्रचित होकर सुनना चाहिए। यह तेज़ हो जाएगी, पास आ जाएगी और अंत में ऊपर से आने लगेगी। यह अंत में आपको मस्त कर देने वाला परमानंद देगी, जिससे समय आने पर, सतगुरु की दया से, आपका मन शांत हो जाएगा । निपुणता हासिल करने के लिए लगातार सच्चा प्रयास चाहिए। इसमें समय भी लगता हैं। आध्यात्मिक लक्ष्य को पाने के लिए की गई हर कोशिश इस आंतरिक यात्रा में सहायक होती है ।

(क्रमश:)

**(कृपाल आश्रम, अहिल्यानगर)**

## अंतरिक बल (भाग - २)

के लिये जो जिम्मेदार है उन्हे शुद्ध संकल्प दो । मेरे बस में प्यार करना है। सभी को मन से प्यार करते रहो। कोई लड़ाई है, झगडा है, लोग हैं, देश में दुख हैं, हमारे छोटे भाई बहिनों का शोषण हो रहा है। देश व विश्व में लोग बहुत दुखी हैं। हमारे बस में क्या है? सिर्फ दुआयें करना। इस से आप बुद्धिवान बनेंगे।

बुद्धिवान व्यक्ति लोगों का संकल्पों से मनोबल बढ़ाते हैं। बाबा (भगवान) को सामने रखते हुये उनके प्रति कल्याण के संकल्प करें। इस से उन तक हमारे संकल्प पहुचेंगें, वह भी बुद्धिमान बनेंगे और मनचाहे अच्छे लक्ष्य पा लेगें। बुद्धिवान को इस बात का डर रहता है कि गलत सोचने और गलत रास्ते पर चलने से इसका अंजाम भुगतना पड़ेगा वह बुराई से दूर रहता है। मोटी बुद्धि कुछ ज्यादा ही मगरूर हो कर गलत सोचता और गलत काम करता है।

दूसरों को पैसा लुटा कर या चापलूसी कर के मित्रता नहीं करनी चाहिये। ये गुलामी है । आप उंच स्थान पर पहुंच कर ऐसी ही गुलामी चाहेगें।

### बुद्धीमानी

गुलाम कभी बुद्धिमान नहीं बन सकता परंतु सभी को दिखता है कि वह बहुत बुद्धिमान है।

बुद्धिवान हमेशा भले काम करता है और मोटी बुद्धि सामने होने पर मुख से बहुत अच्छे प्रवचन करता है और पीठ पीछे साजिश रचता है। अगर आप को आदेश दिये जाते हैं तो बुद्धिवान नहीं बन सकते। हां अच्छे मैनेजर बन जायेंगे ।

आप जहां भी हैं, आप माता हैं, आप कर्मचारी हैं, किसी धर्म में हैं, आप को आदेश मानने होगें, आप को क्या काम करना है, दिन में एक बार समझ लो, अपने काम को इतने अच्छे ढंग से करें कि किसी को आप से उल्टा बोलने की जरूरत न पड़े। जिस को जो चाहिये उसे तुरंत मिल जाये।

अगर आप को कहा जाता है, चाय बनाओ, रोटी बनाओ, यहां जाओ, वहां जाओ, यहां बैठो वहां बैठो, इनसे बोलो, उनसे मत बोलो

नहीं तो ठीक नहीं होगा, आप आराम करना चाहते हैं और आप बिना आज्ञा आराम नहीं कर सकते, ये सब आदेश हैं। ऐसे हालात बनाओ कि आप अपनी मर्जी से अच्छा, जो चाहे कर सकें। गलत कामों के लिये मर्जी नहीं कह रहा हूं अच्छे कार्यों के लिए कह रहा हूं। तब आप बुद्धिवान बन सकेगें। आइन स्टाइन अपने काम के कमरे में जब चला जाता था तो प्रधानमंत्री को भी मिलने के लिये इंतजार करना पड़ता था।

कुछ लोग कहते हैं हम अच्छे काम के लिये शहीद हो जायेंगे, हमारे मेले लगेगें। यह भी मोटी बुद्धि की निशानी है विश्व की हर आत्मा महान है। अगर हम उनके महत्व को समझें तो ऐसे बोल नहीं निकलेगें।

हर आत्मा आप को दिल पर बिठायेगी। ऐसे बोल तब निकलते हैं जब आप दूसरों को मच्छर समझते हैं और मच्छर काट लेता है तो जान की आफत आ जाती है। लव ऐवरी वन । हरेक आत्मा को मन से प्यार करो। तब आप बुद्धिवान बनेंगे नहीं तो स्वार्थी बुद्धिवान बनेंगे।

(क्रमश:)

**(प्रजापिता ब्रम्हाकुमारी ईश्वरीय विश्व विद्यालय)**

## हसा आणि शतायुषी व्हा!

मालकाने नोकराला डास मारायला सांगितले.
नोकर आळशी होता. थोड्या वेळाने डास पुन्हा भुनभुन करु लागले.
मालकाने पुन्हा नोकराला विचारले - डास मारले नाहीत का?
नोकर म्हणाला - डास मारलेत...
या त्यांच्या विधवा बायकांच्या रडण्याचा आवाज आहे.....

## करुया स्पर्धा परिक्षांची तयारी

* लक्ष्मीनारायण तंत्रज्ञान विद्यापीठाच्या कुलगुरूपदी कोणाची नियुक्ती करण्यात आली? - डॉ. अतुल नारायण वैद्य

**- अरविंद ब्राम्हणे,** भिंगार मो. ९४०३७३४२८१

# आहारवेद - आरोग्य संवर्धन

उपयोग : दही घुसळून त्याचे ताक बनविताना वर लोण्याचा थर जमा होतो. जे ताजे लोणी अत्यंत मृदू असते, ते लहान बालकांपासून वयोवृद्धांपर्यंत सर्वांचे आरोग्य चांगले राखण्यासाठी अमृताप्रमाणे कार्य करते.

ताजे लोणी रुचकर असते. तसेच त्यामध्ये विलक्षण सामर्थ्य असते. लोणी खाल्ल्याने शरीर सुकुमार बनते. त्वचेवरील सुरकुत्या जाऊन त्वचा कांतीमय होते.

लहान मुलांचे आरोग्य सुधारण्यासाठी, शरीर सुदृढ व पचनशक्ती वाढण्यासाठी त्यांच्या आहारात नेहमी लोण्याचा वापर करावा. पोळीला लोणी व थोडी पिठीसाखर लावून तिचा रोल बनवून ती खाण्यास द्यावी.

मूळव्याधीमध्ये जर रक्त पडत असेल, तर अशावेळी लोणी आणि खडीसाखर एकत्र खाण्यास द्यावे. खोकला येऊन घसा कोरडा पडला असेल, तर अशा वेळी अजूनच जास्त खोकल्याची उबळ येते. घशातील कोरडेपणा दूर करून खोकला कमी करण्यासाठी ताज्या लोण्याची गरम करून तयार केलेली विरघळ प्यायला दिल्यास फायदा दिसून येतो.

### पित्त प्रवृत्ती

लोणी अग्निप्रदीपक असल्यामुळे त्याच्या सेवनाने भूक चांगली लागते.

लोणी पित्तवर्धक आहे. त्याच्या सेवनाने डोळ्यांचे आलोचक पित्त वाढते. त्यामुळे त्याचे नियमित सेवन करणाऱ्याला चष्मा लागत नाही व पर्यायाने डोळ्यांचे आरोग्य चांगले राहते.

दही घुसळून तयार केलेल्या ताज्या लोण्यामुळे सर्दी होत नाही व हे ताजे लोणी स्वादिष्ट व मधुर असल्याने शरीराचा व मनाचा सर्वांगीण विकास करणारे असते.

ताजे लोणी शीतल, पचण्यास हलके, बलकारक, वीर्यवर्धक व बुद्धिवर्धक असल्याने शारीरिक पुष्टीबरोबरच मानसिक ताणतणाव असणाऱ्या व्यक्तींनी व बुद्धिजीवी व्यक्तींनी आहारामध्ये कायम लोण्याचे सेवन करावे.

१०. गायीचे लोणी व खडीसाखर एकत्र करून खाल्ल्यास जुना ताप बरा होतो.

११. गायीच्या दुधापासून तयार केलेले लोणी, खडीसाखर, मध व किंचित सुवर्णभस्म एकत्र करून खायला दिल्यास क्षयरोग आटोक्यात येऊन रुग्णास शक्ती निर्माण होऊन बल प्राप्त होते.

१२. जुलाब होत असतील तर लोण्यामध्ये मध व खडीसाखर मिसळून खावे. याने जुलाब कमी होतात.

१३. गायीच्या दुधापासून तयार केलेले लोणी डोळ्यांवर चोळल्यास डोळ्यांची जळजळ कमी होते.

**(क्रमश:)**

**डॉ. शारदा निर्मळ-महांडुळे**
दुर्वांकुर वंध्यत्व निवारण व गर्भसंस्कार सेंटर
अहिल्यानगर मोबाईल नं- ८७९३४००४००





आर्किटेक्ट इंजिनीअर्स अ‍ॅण्ड सर्व्हेअर्स असो, अहिल्यानगर आणि पोलाद स्टील यांच्या संयुक्त विद्यमाने पालक होणे महत्त्वाचे की पालकत्व करणे या विषयावर व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले. (छाया – लहू दळवी)

# ‘पालक होणे की पालकत्व करणे’ वर डॉ.श्यामा मंत्री यांचे मार्गदर्शन

## आर्किटेक्ट इंजिनीअर्स अ‍ॅण्ड सर्व्हेअर्स असो, अहिल्यानगर व पोलाद स्टील यांच्या संयुक्त विद्यमाने व्याख्यानाचे आयोजन

नगर – सध्याच्या मोबाईल युगात व्यक्ती–व्यक्तीतील संवाद कमी होत चालला असून, पालकांचे मुलांकडे दुर्लक्ष आणि वाढती स्पर्धा यामुळे मनुष्य एकमेकांपासून दुरावत चालला आहे, असे सायकॉलॉजिस्ट, कौन्सेलर, पेरेंटिंग कोच, आंतरराष्ट्रीय बिहेविअर थेरपिस्ट आणि योगा इन्स्ट्रक्टर डॉ. श्यामा मंत्री म्हणाल्या. मुले मोठ्यांचे अनुकरण करतात – ते बघून शिकतात, ऐकून नाही. पालकांनी मुलांशी संवाद साधताना स्वतःच्या आचरणाकडे लक्ष दिले पाहिजे. आजचा पालक एवढा गोंधळलेला आहे की त्याला मुलांसमोर कसे वागायचे, कसे बोलायचे हे समजेनासे झाले आहे. मोबाईलचा वापर आपणच जास्त करत असताना मुलांना मोबाईल वापरू नका असे सांगणे दांभिक ठरते, असे त्या म्हणाल्या.

आर्किटेक्ट इंजिनीअर्स अ‍ॅण्ड सर्व्हेअर्स असो, अहिल्यानगर आणि पोलाद स्टील यांच्या संयुक्त विद्यमाने पालक होणे महत्त्वाचे की पालकत्व करणे या विषयावर प्रेरणादायी व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले. या व्याख्यानासाठी डॉ. श्यामा मंत्री प्रमुख वक्त्या म्हणून उपस्थित होत्या.

आईच्या माध्यमातून मुलांवर गर्भात असतानाच संस्कार होतात, आणि आजूबाजूचे वातावरणच मुलांना घडवत असते, असे सांगून त्या म्हणाल्या की, आपली मुले म्हणजे लिटमस पेपर आहेत – आपण त्यांना गटाराचे पाणी देतो की गंगाजल, त्यावर त्यांचे घडणे अवलंबून असते. त्या पुढे म्हणाल्या की, जुन्या संस्कृत श्लोकानुसार बाळाचे पहिले पाच वर्षे लाड करा, पुढील पाच वर्षे त्यांना शिस्त लावा, आणि पंधरा वर्षांनंतर मित्रासारखे वागा. मुलांना मित्र नव्हे तर आईचे वात्सल्य आणि वडिलांचा करारीपणा हवा आहे. मुलांच्या पाठीवर मित्र म्हणून नाही, तर प्रेमळ पालक म्हणून हात ठेवावा, असे त्यांनी सांगितले.

पालकत्व म्हणजे पतंग उडवण्यासारखे आहे – कधी ढील, तर कधी ताण देऊनच पतंग उंच भरारी घेतो. तसेच, पालकत्वात शिस्त ही अत्यंत महत्त्वाची गोष्ट असल्याचे त्यांनी अधोरेखित केले. मुलांना त्यांच्या मताप्रमाणे जगू द्या, त्यांची इतरांशी तुलना करू नका, त्यांना ऐका, समजून घ्या, आणि त्यांच्या मनात आपलेपणा निर्माण करा, असेही त्यांनी नमूद केले.

आई–वडिलांचे मतभेद मुलांसमोर कधीच उघड करू नयेत, कारण त्याचा वाईट परिणाम मुलांच्या मनावर होतो. ज्या घरात पालकांमधील वाद मुलांसमोर होत नाहीत, त्या घरातील मुले पालकांशी मनमोकळे बोलतात, असेही त्या म्हणाल्या. पालकत्व म्हणजे मुलाला आधार देऊन सांगणे – ‘तू पुढे जा, मी तुझ्या पाठीशी आहे’, असा संदेश डॉ. मंत्र्यांनी दिला.

या कार्यक्रमात संस्थेचे सभासद असताना सामाजिक व राजकीय क्षेत्रात कार्य करीत यश संपादन केलेल्या संदीप ठुबे, ज्योती ठुबे, संध्या पवार, बाळासाहेब पवार आणि अंतू वारुळे यांना सन्मानित करण्यात आले.

कार्यक्रमास संस्था अध्यक्ष अभिजित देवी, सचिव भूषण पांडव, तसेच सुनिल औटी, संतोष खांडेकर, आदिनाथ दहिफळे, संजय चांडवले, सुनिल जाधव, अनमोल जैन, गौरव मांडगे, संकेत पादीर, जितेश सचदेव, विजय पादीर, रोहित लूनिया, विनोद काकडे, दादासाहेब बेरड व सभासद उपस्थित होते.

संस्था सभासद कोमल कुलकर्णी, प्रदीप तांदळे, ऐश्वर्या देवी, रुपाली देवी आणि सुचेता पांडव यांनी सन्मानित अतिथींचा परिचय करून दिला. वैशाखी हिरे यांनी कार्यक्रमाचे सूत्रसंचालन केले. प्रणाली तांदळे यांनी आभार मानले.

# प्रेरणादायी अक्षरधन

## धर्म आणि निति

“मुसाफिर” वाचनीय मननीय प्रेरणादायी अक्षर धन संकलन: दिशान फिचर्स

समाज मनाला सुखावणारी चैतन्य पालवी डॉ.रामचंद्र देखणे ‘चपराक’ प्रकाशित ललित चिंतन

तत्त्ववेत्त्यांनी आणि पंडितांनी प्राचीन काळापासून नीती या अर्थी धर्म हा शब्द वापरला आहे. हे धर्मशास्त्र म्हणजे त्या काळचे समाजशास्त्रच होते आणि परमार्थाचे जे शास्त्र ते ’मोक्ष–धर्म–शास्त्र’ असे रूढ होते. राजाने धर्माने राज्य मिळवावे आणि धर्माने त्याचे रक्षण करावे असे महाभारतातही म्हटले आहे. इथे धर्म शब्दाचा अर्थ मोक्ष किंवा परमार्थ असा नाही तर इथे नीतीचीच विवक्षा आहे.

ज्ञानेश्वर माउली म्हणतात,
’म्हणौनि स्वधर्मे निष्कामता ।
अनुसरले पार्था ।
तेथ कैवल्यपद तत्वता ।
पातले जगी।।’

अरे, निष्काम बुद्धिने भगवंताने दिलेल्या विहित कर्माचे आचरण करण्यातच कैवल्याची प्राप्ती आहे. म्हणून धर्मापासून म्हणजे विहित कर्मापासून दूर जाऊ नकोस. लोक आपापल्या कर्म धर्मापासून दूर जातील तर जगत् व्यवहारातील सुसूत्रता नाहीशी होईल. म्हणून प्रत्येकाला आपापल्या धर्माचे आचरण करण्याचा महान संदेश महात्म्यांनी दिला आहे. साने गुरुजींनी म्हटले आहे, ज्याच्याशिवाय आपण जगू शकत नाही, ज्याच्यासाठी जगावे आणि मरावे वाटते तोच आपला वर्णधर्म होय आणि जसा जो स्वतःचा वर्ण तोच स्वत:चा सेवा–धर्म होय.

धर्म ही संकल्पना सेवाकर्माशी साने गुरुजींनी जोडली आहे. शुद्ध कर्मातच शुद्ध धर्म उभा आहे. दिवसभर रानात काम करणारा शेतकरी हा शेतकरी धर्माला जागणारा आहे. तो धर्माची शास्त्रीय मांडणी करु शकणार नाही पण मूर्तिमंत धर्म म्हणजे काय हे तो आपल्या कर्तव्यातून उभा करेल.

धर्म हा आचार, विचार, तत्त्व या अर्थाने वापरत असताना शास्त्रकारांनी धर्म हा पुरूषार्थही सांगितला आहे. मानवी जीवनाचे कल्याण व्हावे यासाठी काम व अर्थ यावर नियंत्रण ठेवणारा आणि मोक्षाकडे नेणारा धर्म हा पुरुषार्थ आहे. तराजूच्या दोन पारड्यांप्रमाणे एका पारड्यात काम आणि अर्थ टाकला आहे आणि दुसऱ्या पारड्यातं मोक्ष ठेवला आहे. मध्यभागी धर्माचा काटा आहे. तो स्थिर असेल तर काम आणि अर्थ यातूनही मोक्ष तोलता येतो. म्हणून इच्छा, कामवासना या नैसर्गिक व सहज प्रवृत्तींवर विचारपूर्वक नियंत्रण आणि नियोजन करून प्रमाणबद्ध रीतीने जीवनाची आखणी करणारा धर्म हा पुरुषार्थ शास्त्रकारांनी सुचविला आहे. यावरून धर्म ही संकल्पना समाज– जीवनाला किती निकडीची आहे हे लक्षात येईल. धर्म म्हणजे नीती, धर्म म्हणजे नियम, धर्म म्हणजे संतुलन, जीवनात संयम, नीती, संतुलन येण्यासाठी धर्म आवश्यक आहे.

– किशोर गांधी

# ‘आयएमएस’च्या ‘एमसीए’ व ‘एमबीए’ मुलांना अभ्यासक्रम पूर्ण होण्यापूर्वीच ‘प्लेसमेंट ऑफर’

## उत्कृष्ट शैक्षणिक गुणवत्तेमुळे विद्यार्थ्यांना लाभ होतो : डॉ.एम.बी.मेहता



नगर – येथील आय एम एस कॉलेजमध्ये एमबीए आणि एम सीएच्या मुलांना विविध कंपनीमध्ये प्लेसमेंट झाले आहे. यापैकी एल टी आय माईंड ट्री, बजाज फायनान्स, स्थान्जा लिविंग, बर्जर पेंट्स, पोलाद स्टील, इंडियन पोस्ट पेमेंट बँक, अल्टुरीस टेक्नॉलॉजी, ट्रिपल डॉट एआय, अरह माहिती सोल्युशन्स, सायबर सक्सेस, इट ऑन कॉर्पोरेशन, डब्ल्यू एन एस, युनिक रिंगर, कारवी इन्फोटेक या कंपनी तर्फे मुलांना प्लेसमेंट ऑफर देण्यात आले.

संस्थेचे डायरेक्टर डॉ. एम.बी. मेहता, डेप्युटी डायरेक्टर डॉ. विक्रम बर्नबस, विभाग प्रमुख डॉ. प्रणोती तेलोरे, डॉ. महेश पोतदार यांनी कंपनीचे आभार मानले. प्रा. सुरेश खन्ना यांनी विशेष परिश्रम घेतले.

डॉ. एम.बी. मेहता म्हणाले, उत्कृष्ट शैक्षणिक गुणवत्ता आय एम एस संस्थेची ओळख आहे. शिकताना परिपूर्ण ज्ञान मिळत असल्याने कोर्स पूर्ण होताना विद्यार्थी नोकरीसाठी एकदम सक्षम होतो. येथील गुणवत्तेची खात्री असल्याने अनेक नामांकित कंपन्या आवर्जून मुलांना प्लेसमेंट देतात. त्यामुळे विद्यार्थी लवकर करीअर सुरू करून भविष्यात मोठी झेप घेतात.

# अहिल्याबाई होळकर स्मारक ‘चांदीच्या नाण्याचे’ सादरीकरण

## अहिल्याबाई होळकर स्मारक नाणी हा आपल्या गौरवशाली इतिहासाची आठवण करून देणारा – आसिफ खान यांचे प्रतिपादन

नगर – अहिल्याबाई होळकर या केवळ एक शासक नव्हत्या, तर त्या न्याय, सेवा आणि धर्मनिष्ठेचे प्रतीक होत्या. त्यांच्या ३०० व्या जयंतीनिमित्त भारत सरकारने काढलेला स्मारक चांदी नाणी हा आपल्या गौरवशाली इतिहासाची आठवण करून देणारा आहे. अशा उपक्रमांमुळे इतिहासाचे संवर्धन होऊन तरुण पिढीला प्रेरणा मिळते. अहमदनगर इतिहास प्रेमी मंडळ सदैव अशा ऐतिहासिक उपक्रमांना प्रोत्साहन देत राहील, असे प्रतिपादन अहमदनगर इतिहास प्रेमी मंडळाचे अध्यक्ष आसिफ दुलेखान यांनी केले.





अहिल्याबाई होळकर यांच्या ३०० व्या जयंतीनिमित्त भारत सरकारतर्फे तीनशे रुपयांच्या चांदीच्या स्मारक नाणी जारी करण्यात आला आहे. या ऐतिहासिक स्मारक नाण्याचे नगर येथील जुन्या नाणे व नोटा संग्राहक सचिन डागा यांनी अहमदनगर इतिहास प्रेमी मंडळाला भेट देत सादरीकरण केले.

अहिल्याबाई होळकर यांच्या ३०० व्या जयंतीनिमित्त भारत सरकारतर्फे तीनशे रुपयांच्या चांदीच्या स्मारक नाणी जारी करण्यात आला आहे. या ऐतिहासिक स्मारक नाण्याचे नगर येथील जुन्या नाणे व नोटा संग्राहक सचिन डागा यांनी अहमदनगर इतिहास प्रेमी मंडळाला भेट देत सादरीकरण केले. याप्रसंगी अहमदनगर इतिहास प्रेमी मंडळाचे अध्यक्ष आसिफ दुलेखान, इंजि. अभिजीत एकनाथ वाघ, आरिफ सय्यद, राजा भैया, पत्रकार आबीद खान यांच्यासह इतिहासप्रेमी नागरिक उपस्थित होते.

मनोगत व्यक्त करताना सचिन डागा म्हणाले की, अहिल्याबाई होळकर यांचे सामाजिक, धार्मिक व प्रशासकीय कार्य आजही प्रेरणादायी असून त्यांच्या स्मृती जतन करण्यासाठी भारत सरकारने काढलेला हा स्मारक नाणी ऐतिहासिक महत्त्वाचा ठरत आहे. अशा उपक्रमांमुळे नव्या पिढीमध्ये इतिहासाविषयी जागरूकता निर्माण होईल असे नमूद केले.

# जिल्हा परिषद शाळेच्या मंजुश्री घोरपडेला भारत सरकारचा ‘राष्ट्रीय पुरस्कार’ प्रदान

## उपराष्ट्रपती भारताचे संरक्षण राज्यमंत्री, शिक्षण राज्यमंत्री व भारतीय लष्कराच्या तिन्ही दलाच्या प्रमुखांच्या हस्ते गौरव

नगर – नगर तालुक्यातील माथणी येथील जिल्हा परिषदेच्या प्राथमिक शाळेतील मंजुश्री घोरपडे या विद्यार्थीनीस भारत सरकार संरक्षण मंत्रालय व शिक्षण मंत्रालयाच्या वतीने वीरगाथा राष्ट्रीय पुरस्कार नवी दिल्ली येथे नुकताच भारताचे उपराष्ट्रपती सी.पी. राधाकृष्णन, भारताचे संरक्षण राज्यमंत्री संजय सेठ, भारताचे शिक्षण राज्यमंत्री जयंत चौधरी, भारताचे लष्कर प्रमुख जनरल अनिल चौहान, भारताचे नौदल प्रमुख दिनेशकुमार त्रिपाठी, भारताचे हवाईदल प्रमुख अमरप्रीत सिंग, भारताचे संरक्षण सचिव डॉ. समीर कामंत, भारताचे शिक्षण सचिव संजय कुमार, भारताचे अर्थिक सल्लागार राजकुमार अरोरा यांच्या हस्ते प्रदान करण्यात आला. यावेळी तिचे मार्गदर्शक शिक्षक सुनील अडसूळ उपस्थित होते.







नगर तालुक्यातील माथणी येथील जिल्हा परिषदेच्या प्राथमिक शाळेतील मंजुश्री घोरपडे या विद्यार्थीनीस भारत सरकार संरक्षण मंत्रालय व शिक्षण मंत्रालयाच्या वतीने वीरगाथा राष्ट्रीय पुरस्कार नवी दिल्ली येथे नुकताच भारताचे उपराष्ट्रपती सी.पी. राधाकृष्णन, भारताचे संरक्षण राज्यमंत्री संजय सेठ, भारताचे शिक्षण राज्यमंत्री जयंत चौधरी आदींच्या हस्ते प्रदान करण्यात आला.

भारताचे उपराष्ट्रपती सी.पी. राधाकृष्णन व सर्व मान्यवरांनी या पुरस्काराबद्दल अभिनंदन केले. भारत सरकार संरक्षण मंत्रालय व शिक्षण मंत्रालय यांच्याद्वारे शैक्षणिक वर्ष २०२५– २६ मध्ये राबविण्यात आलेल्या वीरगाथा ५.० या राष्ट्रीय स्पर्धेमध्ये अहिल्यानगर जिल्ह्यातील नगर तालुक्यातील माथणी येथील जिल्हा परिषदेच्या प्राथमिक शाळेतील मंजुश्री घोरपडे या विद्यार्थीनीची राष्ट्रीय वीरगाथा स्पर्धेत राष्ट्रीयस्तरावर सुपर १०० विजेत्यांमध्ये निवड झाली होती. या राष्ट्रीय स्पर्धेतील सुपर १०० विजेत्या विद्यार्थ्यांना नवी दिल्ली येथे प्रजासत्ताक दिनानिमित्त राष्ट्रीय पुरस्कार प्रदान करण्यात आले. त्यामध्ये मंजुश्री घोरपडे या विद्यार्थ्यांनीचा समावेश होता. या विद्यार्थीनीस शाळेतील शिक्षक सुनील अडसूळ, राहुल व्यवहारे यांनी मार्गदर्शन केले होते.

तसेच भारत सरकारच्या वीरगाथा उपक्रमाच्या संगमनेर डायटच्या नोडल अधिकारी ज्योती निंबाळकर यांनी वेळोवेळी शिक्षकांना मार्गदर्शन केले होते. या स्पर्धेत देशभरातून १,९२,४८,००९ स्पर्धक विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदविलेला होता. तसेच या विद्यार्थ्यांची भारत सरकारच्या नवी दिल्ली येथील प्रजासत्ताक दिन सोहळ्यात प्रमुख अतिथी म्हणून निवड झाली होती.

शौर्य पुरस्कार विजेते व प्राचीन भारतीय योद्ध्यांच्या प्रेरणादायी कथांद्वारे विद्यार्थ्यांमध्ये देशभक्तीची भावना व नागरी जागरूकता निर्माण करणे हा या उपक्रमाचा प्रमुख उद्देश आहे. भारत सरकारच्या वीरगाथा राष्ट्रीय पुरस्कारबद्दल राज्याचे शालेय शिक्षणमंत्री दादा भुसे, अहिल्यानगर जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी आनंद भंडारी, जिल्हा परिषदेचे प्राथमिक विभागाचे शिक्षणाधिकारी भास्कर पाटील, संगमनेर डायटचे प्राचार्य डॉ. राजेश बनकर, शिक्षणमंत्री यांचे स्वीय सहाय्यक योगेश सोनवणे, संगमनेर डायटच्या जिल्हा नोडल अधिकारी ज्योती निंबाळकर, मुकुंद दहिफळे, डायटचे सर्व अधिव्याख्याते, गटशिक्षणाधिकारी तृप्ती कोलते, बीटचे शिक्षण विस्तार अधिकारी रवींद्र कापरे, केंद्रप्रमुख संजय धामणे, राष्ट्रपती पुरस्कार प्राप्त विक्रम अडसूळ, कृषी उत्पन्न बाजार समितीचे संचालक मंजाबापू घोरपडे, सरपंच विलासराव घोरपडे, उपसरपंच अशोक कांडेकर, अण्णासाहेब जगताप, शाळा व्यवस्थापन समिती अध्यक्ष सुधीर घोरपडे, ग्रामस्थ, पालक, या सर्वांनी विद्यार्थीनी व मार्गदर्शक शिक्षक यांचे अभिनंदन केले आहे.





नगर रायझिंग हाफ मॅरेथॉन स्पर्धा उत्साहात झाली. या स्पर्धेत २१ किलोमीटर प्रकारात भूषण भाटिया, सूर्यकांत पारधी, आश्लेषा पाटील, स्मिता उकिर्डे यांनी, तर १० किलोमीटर प्रकारात मंगेश रासकर, अजय नारुका, अर्जिता, मंगल बोठे यांनी आपल्या गटात प्रथम क्रमांक मिळवला.

# हाफ मॅरेथॉनमध्ये धावले नगरकर; हजारो नागरिकांचा उत्स्फूर्त सहभाग

नगर – नगर रायझिंग हाफ मॅरेथॉन स्पर्धा रविवारी उत्साहात झाली. या स्पर्धेत २१ किलोमीटर प्रकारात भूषण भाटिया, सूर्यकांत पारधी, आश्लेषा पाटील, स्मिता उकिर्डे यांनी, तर १० किलोमीटर प्रकारात मंगेश रासकर, अजय नारुका, अर्जिता, मंगल बोठे यांनी आपल्या गटात प्रथम क्रमांक मिळवला. या स्पर्धेत हजारो नागरिकांनी सहभाग नोंदविला. स्पर्धेचे पारितोषिक वितरण आमदार संग्राम जगताप यांच्या उपस्थितीत झाले. स्पर्धेत २१ किलोमीटर मॅरेथॉनला फाउंडेशनचे अध्यक्ष नरेंद्र फिरोदिया यांनी, तर १० व ४ किलोमीटरच्या उद्योजिका रिंकू फिरोदिया हस्ते झेंडा दाखवून प्रारंभ करण्यात आला. यावेळी नगर रायझिंगचे संचालक संदीप जोशी, ‘सोहम ग्रुप’चे व्यवस्थापकीय संचालक अमित बुरा, जिल्हाधिकारी डॉ. पंकज आशिया, जिल्हा पोलीस अधीक्षक सोमनाथ घार्गे, ट्रस्टी डॉ. सतीश सोनवणे, डॉ. श्याम तारडे, अ‍ॅड. गौरव मिरीकर, नगर छावणी परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी पल्लवी विजयवंशी आदी उपस्थित होते.

ही मॅरेथॉन स्पर्धा २१ किलोमीटर, १० किलोमीटर व ४ किलोमीटर अशा तीन प्रकारांत झाली. सहभागी स्पर्धकांना टी शर्ट, चेस नंबर, भेट वस्तू व पदक देण्यात आले. राजकीय, सामाजिक क्षेत्रातील दिग्गजांनी या स्पर्धेत सहभागी होत या मॅरेथॉनचा आनंद लुटला. यात माजी आमदार नरेंद्र घुले, क्षितिज घुले, नमिता मुंदडा, श्रीनिवास बोज्ञा आदी सहभागी झाले होते.

मॅरेथॉनमध्ये दिव्यांगांनी सहभाग नोंदवत सहभागींचा उत्साह वाढवला. यात विषरुदा शेळके, अर्णव अवचर आदी दिव्यांगांचा समावेश होता. त्यांची स्पर्धेतील अंतर पूर्ण करण्याची जिद्द पाहून जीवन जगण्याची नवीन ऊर्जा मिळाल्याचे काही सहभागींनी सांगितले.

स्पर्धेचे विजेते

२१ किलोमीटर – युवक – प्रथम – भूषण भाटिया, द्वितीय – राज सिंग, तृतीय – ऋतिक पटेल

ज्येष्ठ – प्रथम – सूर्यकांत पारधी, द्वितीय – ज्ञानेश्वर घोरगे, तृतीय – रवींद्र चोभे

युवती – प्रथम – अश्लेषा पाटील, द्वितीय – जया खंडेलवाल, तृतीय – शीतल कर्पे

ज्येष्ठ – प्रथम – स्मिता उकिर्डे, द्वितीय – कविता खंडेलवाल, तृतीय – रुपाली खंडेलवाल

१० किलोमीटर – युवक – प्रथम – मंगेश रासकर, द्वितीय – पंकज पिंत, तृतीय – जालिंदर चेमटे

ज्येष्ठ – प्रथम – अजय नारुका, द्वितीय – महेश मुळे, तृतीय – बाजीराव बोठे

युवती – प्रथम – अर्जिता, द्वितीय – स्मिता तांबडे, तृतीय – सलोनी चोरबेले

ज्येष्ठ महिला – प्रथम – मंगल बोठे, द्वितीय – चैताली गांधी, तृतीय – प्राची पवार

# पाऊलबुद्धे कॉलेज ऑफ फार्मसीमध्ये फ्रेशर्सचे स्वागत

नगर – वसंत टेकडी येथील सेवा शिक्षण प्रसारक मंडळाच्या डॉ. एन.जे.पाऊलबुद्धे कॉलेज ऑफ फार्मसी येथे प्रथम वर्ष डी.फार्म व बी.फार्म विद्यार्थ्यांसाठी फ्रेशर्स पार्टी उत्साहात पार पडली. नवीन फ्रेशर्स चे स्वागत करण्यात आले यावेळी कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे सेवा शिक्षण प्रसारक मंडळाचे सचिव रामकिसन देशमुख होते. कार्यक्रमास महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.श्याम पांगा, डी.फार्म प्राचार्या प्रा. अनुराधा चव्हाण उपस्थित होत्या. या कार्यक्रमाच्या आयोजन सचिव म्हणून फार्मास्युटिकल केमिस्ट्री च्या विभागप्रमुख डॉ. रोशनी सूर्यवंशी यांनी जबाबदारी सांभाळली.

कार्यक्रमास विभागप्रमुख डॉ. प्रसाद घुगरकर, विभागप्रमुख सौ. स्वाती कडनोर, प्राध्यापकवर्ग व विद्यार्थी उपस्थित होते. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी डॉ.विजय तारडे, सहाय्यक प्राध्यापक पल्लवी कदम, दुर्गेश पवळे यांनी परिश्रम घेतले.

यावेळी ‘फार्मा बिग बॉस’ या संकल्पनेवर आधारित फ्रेशर्स वीक साजरा करण्यात आला. विद्यार्थ्यांसाठी विविध खेळ, मनोरंजनात्मक उपक्रम, स्पर्धा व मजेशीर क्रियाकलाप आयोजित करण्यात आले.

या प्रसंगी मिस्टर व मिस फ्रेशर यांची निवड करून सन्मान करण्यात आला.

डी.फार्म विभागातून मिस्टर फ्रेशर – पवार अभिनव व मिस फ्रेशर – शेख शिफा, तर बी.फार्म विभागातून मिस्टर फ्रेशर–पंडित करण व मिस फ्रेशर–भक्ती कर्डिले यांची निवड करण्यात आली. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सहाय्यक प्राध्यापक श्रद्धा मुंदडा व पोर्णिमा साळुंके यांनी प्रभावीपणे केले, तर आभार प्रदर्शन बी.फार्म विद्यार्थी ओम शेकडे यांनी केले.

हा कार्यक्रम विद्यार्थ्यांसाठी संस्मरणीय ठरला असून महाविद्यालयातील शैक्षणिक व सहशैक्षणिक वातावरण अधिक समृद्ध करणारा ठरला.

या कार्यक्रमाला संस्थेचे अध्यक्ष विनय पाऊलबुद्धे, उपाध्यक्ष रामभाऊ बुचकूल, खजिनदार दादासाहेब भोईटे,व्यवस्थापकीय संचालक साई पाऊलबुद्धे, सदस्य रघुनाथ कारमपुरी यांनी शुभेच्छा दिल्या.

# घुमरे गल्लीतून मोपेडची चोरी; गुन्हा दाखल

नगर – शहरातील घुमरे गल्लीतील वसंत पेंट शेजारी दुधाटवाडा येथे लावलेली सुझुकी कंपनीची मोपेड (क्र. एमएच १६ बीडी ३५१९) अज्ञात चोरट्याने चोरून नेल्याची घटना १ फेब्रुवारी रोजी सायंकाळी ७ ते २ फेब्रुवारी रोजी सकाळी ६ या कालावधीत घडली.

याबाबत सुनीता सुनील दुधाट (वय ५६, रा. दुधाटवाडा, घुमरे गल्ली, अहिल्यानगर) यांनी कोतवाली पोलिस ठाण्यात फिर्याद दिली आहे.

या फिर्यादी वरून पोलिसांनी अज्ञात चोरट्याविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे.

# समर्थ विद्या मंदिर प्रशालेस (प्राथमिक विभाग) 'दादासाहेब साताळकर फिरता करंडक' प्राप्त

नगर – नवविद्या प्रसारक मंडळ व शारदा मंदिर, अहिल्यानगर, महर्षी ग. ज. चितांबर विद्यामंदिर येथे ३१ जानेवारी रोजी आयोजित प्राथमिक शालांतर्गत आंतरशालेय कथाकथन स्पर्धेत श्री समर्थ विद्या मंदिर प्रशाला प्राथमिक विभागाच्या १० विद्यार्थ्यांनी गट क्र. १ व गट क्र. २ मधून सहभाग नोंदवला तसेच वैयक्तिक व सांघिक यश संपादन करून प्रशालेस दादासाहेब साताळकर फिरता करंडक प्राप्त करून दिला.



'दादासाहेब साताळकर फिरता करंडक' प्राप्त केलेले समर्थ विद्या मंदिर प्रशालेचे विद्यार्थी.

स्पर्धेत पुढील विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला होता.

गट क्र १ – कु. पूर्वा उगले, चि. सार्थक आरगडे, कु. रुद्राक्षी आव्हाड, चि. कृष्णा भाकरे, कु. सान्वी कराळे.

गट क्र २ – कु. ऋचा शेवगावकर, कु. आर्या तांदळे, कु. पूर्वा सरोदे, कु. अनंती देवगुणे, कु. ओवी कुलकर्णी.

सहभागी विद्यार्थ्यांना प्रशालेच्या मुख्याध्यापिका सौ. गुंफेकर, प्रियंका कासार, संपदा नगरकर व शिक्षकांचे मार्गदर्शन लाभले.

याबद्दल विद्यार्थ्यांचे कौतुक करताना प्रशालेच्या मुख्याध्यापिका सौ. गुंफेकर यांनी आजचा हा क्षण अत्यंत अभिमानाचा व आनंदाचा आहे असे उद्गार काढले. तसेच विद्यार्थ्यांनी केलेल्या उत्कृष्ट कामगिरीबद्दल व फिरता करंडक मिळवल्याबद्दल त्यांचे व त्यांच्या पालकांचे तसेच त्यांना मार्गदर्शन करणाऱ्या शिक्षकांचे कौतुक केले. विद्यार्थ्यांच्या सर्जनशीलतेचा व कलेविषयी असणाऱ्या प्रेमाचा हा गौरव आहे, असे प्रतिपादन सौ. गुंफेकर यांनी केले.

याप्रसंगी श्री समर्थ विद्या प्रसारक मंडळाचे उपाध्यक्ष दीपक ओहोळ, संस्थेचे व्हाइस चेअरमन श्रीपाद कुलकर्णी, संस्थेचे सेक्रेटरी तथा शालेय समिती चेअरमन (प्राथ. विभाग) सुरेश क्षीरसागर, सौ. रागिणी ओहोळ यांनी देखील याप्रसंगी उपस्थित राहून मुलांचे कौतुक केले व त्यांना शुभेच्छा दिल्या.

गट क्र १ मधून कु. रुद्राक्षी आव्हाड हिला तृतीय पारितोषिक तसेच गट क्र २ मधून कु. आर्या तांदळे हिला प्रथम क्रमांकाचे पारितोषिक प्राप्त झाले.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन गणेश पारधे, यादिवाचन प्रियंका कासार यांनी केले. वृषाली कुलकर्णी यांनी आभार मानले.

# न्यू लॉ कॉलेजमध्ये ७ व ८ फेब्रुवारीला राज्यस्तरीय अभिरूप न्यायालय स्पर्धा

नगर – न्यू लॉ कॉलेज, अहिल्यानगर येथे कै. न्यायमूर्ती एस. बी. म्हसे पा. यांच्या स्मृतिप्रीत्यर्थ आठव्या राज्यस्तरीय अभिरूप (मूट कोर्ट) न्यायालय स्पर्धेचे आयोजन ७ व ८ फेब्रुवारी रोजी करण्यात आले आहे.

या स्पर्धेचे उद्घाटन ७ फेब्रुवारी रोजी सकाळी ९ वाजता न्यायमूर्ती किशोर सी. संत, उच्च न्यायालय, मुंबई यांच्या हस्ते होणार आहे. उद्घाटन समारंभाच्या अध्यक्षस्थानी अहमदनगर जिल्हा मराठा विद्या प्रसारक समाज संस्थेचे सचिव ॲड. विश्वासराव आठरे पा. हे भूषविणार आहेत.

स्पर्धेचा बक्षीस वितरण समारंभ ८ फेब्रुवारी रोजी सकाळी ११.३० वाजता न्यायमूर्ती संजय ए. देशमुख, उच्च न्यायालय, मुंबई यांच्या हस्ते होणार असून, कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी अहमदनगर जिल्हा मराठा विद्या प्रसारक समाज संस्थेचे अध्यक्ष रामचंद्र एच. दरे हे असणार आहेत.

या राज्यस्तरीय अभिरूप न्यायालय स्पर्धेसाठी राज्यभरातील विविध विधी महाविद्यालयांमधून स्पर्धकांचा प्रतिसाद मिळत असल्याची माहिती प्राचार्य डॉ. एम. एम. तांबे यांनी दिली.

स्पर्धा संयोजन समितीत अहमदनगर जिल्हा मराठा विद्या प्रसारक समाज संस्थेचे सचिव ॲड. व्ही. डी. आठरे पा. खजिनदार ॲड. दिपलक्ष्मी म्हसे पा., ॲड. माणिकराव मोरे, ॲड. माधवेश्वरी म्हसे पा., ॲड. सुभाष भोर आदींचा समावेश आहे. त्यांना महाविद्यालयाचे स्पर्धा समन्वयक प्रा. विजयकुमार शिंदे, डॉ. बाळासाहेब पांढरे, डॉ. अतूल मोर तसेच कार्यालयीन अधीक्षक एच. एम. कदम यांचे सहकार्य लाभत आहे.

अभिरूप न्यायालय स्पर्धेमुळे विद्यार्थ्यांना उत्कृष्ट वकिली कौशल्ये आत्मसात करता येतात. न्यायालयीन कामकाजातील वक्तृत्व, युक्तिवाद मांडणी व प्रकरणे सादर करण्याचे तंत्र या माध्यमातून विद्यार्थ्यांना प्रभावीपणे शिकता येते, असे मत आयोजकांनी व्यक्त केले.

यावेळी अहमदनगर जिल्हा मराठा विद्या प्रसारक समाज संस्थेचे अध्यक्ष रामचंद्र दरे, उपाध्यक्ष डॉ. विवेक भापकर, सचिव ॲड. विश्वासराव आठरे पा., सहसचिव मुकेश मुळे, खजिनदार ॲड. दिपलक्ष्मी म्हसे तसेच सर्व विश्वस्त व कार्यकारी मंडळाचे सदस्य उपस्थित राहणार आहेत.



स्व. प्रकाशलाल गांधी यांच्या स्मृतीप्रित्यर्थ त्यांच्या कुटुंबीयांच्या हस्ते श्री जैन ओसवाल वात्सल्य संस्थेस या महिन्याचे किराणा वाटप करण्यात आले. यावेळी श्रीमती रेखाबाई प्रकाश गांधी, बंधू अनिल गांधी, तसेच पंकज, शुभम, माही, वीरा, देवांश व पुलकित हे कुटुंबीय उपस्थित होते. कार्यक्रमाच्या सुरुवातीला नुकतेच स्वर्गवासी झालेले अशोक फुलचंद कोठारी यांना श्रद्धांजली अर्पण करण्यात आली. त्यांच्या स्मृतीप्रित्यर्थ नवकार महामंत्राचे पठण करून दोन मिनिटे मौन पाळण्यात आले. यावेळी सचिन चोपडा, ईश्वर बोरा उपस्थित होते.

# केडगाव येथे ७ फेब्रुवारीला मोफत नेत्र तपासणी आणि मोतीबिंदू शस्त्रक्रिया शिबीराचे आयोजन

नगर – एच. व्ही देसाई हॉस्पिटल, पुणे व केडगाव येथील हरीहरेश्वर ग्रामविकास प्रतिष्ठाण व जिव्हाळा ज्येष्ठ नागरिक, अपंग, अनाथ, निराधार, मंचाच्यावतीने प्रतिष्ठाणचे अध्यक्ष डॉ. चेमटे श्रीकांत यांनी ७ फेब्रुवारी रोजी सकाळी ८ ते २ वाजेपर्यंत मोफत नेत्र तपासणी व मोफत मोतीबिंदू शस्त्रक्रिया शिबिराचे आयोजन स्वामी विवेकानंद चौक, भुषणनगर, केडगाव देवी, अहमदनगर येथे केले आहे. या शिबीरामध्ये एच.व्ही. देसाई हॉस्पिटल, पुणे येथील तज्ञ डॉक्टरांकडून ऋग्णांची मोफत नेत्र तपासणी करुन डोळ्यांच्या समस्यावर योग्य मार्गदर्शन व औषधोपचार केले जाणार आहेत. तसेच चष्म्याचा अचूक नंबर काढून दिला जाईल व ऋग्णांची रक्तातील साखर व रक्तदाब तपासणी करुन मोफत मोतीबिंदू शस्त्रक्रियेसाठी निवड केली जाणार आहे व मोतीबिंदू शस्त्रक्रियेसाठी निवड केलेल्या ऋग्णांना शिबीराच्या ठिकाणापासून, मोफत प्रवास, राहण्याची, जेवण्याची तसेच मोतीबिंदू शस्त्रक्रियेनंतर काळा गॉगल मोफत, तसेच बिनटाक्याची मोफत मोतीबिंदू शस्त्रक्रिया करुन चांगल्या प्रतीचे लेन्स वापरले जाणार आहेत. तसेच काचबिंदु, लासुर, डोळ्यावरील पडदा या शस्त्रक्रिया केल्या जाणार आहेत. नाव नोंदणीसाठी ९३२५१०८०५७ या नंबरवर संपर्क साधावा, असे आवाहन प्रतिष्ठानचे अध्यक्ष डॉ. चेमटे श्रीकांत यांनी केले आहे.

# खेळामुळे शरीर व मन तंदुरूस्त राहण्यास मदत

## सतीश बोथरा यांचे प्रतिपादन; सकल राजस्थानी युवा मंच आयोजित पारस कप क्रिकेट स्पर्धेत रॉयल रिडिफायनर्स संघाला विजेतपद

नगर – आताच्या धावपळीच्या युगात वैयक्तिक आरोग्यासाठी वेळ काढणे आवश्यक आहे. शरीर व मन तंदुरुस्त ठेवायचे तर खेळ खेळायला हवे. मैदानात मोकळ्या हवेत व्यायाम केल्याने, खेळल्याने सकारात्मक ऊर्जा प्राप्त होते. मन आनंदी होते, असे प्रतिपादन सतीश बोथरा यांनी केले. युवा मंच मागील दहा वर्षांपासून क्रिकेट स्पर्धेचे आयोजन करून अतिशय कौतुकास्पद काम करीत आहे. यात महिलांसाठीही स्वतंत्र गटात स्पर्धा घेवून त्यांना प्रोत्साहित केले जाते. अशा उपक्रमांना यापुढेही सहकार्य केले जाईल.


सकल राजस्थानी युवा मंच ट्रस्ट आयोजित पारस कप सिझन १० क्रिकेट स्पर्धेत रॉयल रिडिफायनर्स संघाने विजेतपद व ३१००० रुपये पटकावले.

सकल राजस्थानी युवा मंच ट्रस्ट आयोजित पारस कप सिझन १० क्रिकेट स्पर्धेत रॉयल रिडिफायनर्स संघाने विजेतपद व ३१०००/– पटकावले आहे. देसर्डा भंडारी टॉपर्स संघाला उपविजेतेपद व २१०००/– मिळाले. महिला गटात सॅफ्रन हिल्स संघाला विजेतपद व १५०००/– तर ए.पी.मावरिक्स संघाला उपविजेतेपद व ११०००/– मिळाले. मुलांच्या गटात ग्रीनफिल्ड व्हॅली संघाला विजेतेपद व १५०००/– तर एस.एस.गांधी संघाला उपविजेतेपद व ११०००/– मिळाले. बुरूडगाव रोडवरील साईनगर टर्फ मैदानावर सदर स्पर्धा पार पडली.

स्पर्धेचे बक्षीस वितरण सोहळ्यात पारस ग्रुपचे उद्योजक सतीश बोथरा, महावीर ग्रुपचे राजेश भंडारी, पिपाडा कियाचे प्रितेश पिपाडा, रौनक बोथरा, प्रणेश बोथरा, माजी नगरसेविका शीतलताई जगताप, नगरसेविका मीनाताई चोपडा, अनिता शेटिया, धनेश कोठारी, मंचचे अध्यक्ष संदेश मुनोत, प्रोजेक्ट चेअरमन गौतम भंडारी, प्रविण शिंगवी, अभिनव कोठारी, पुष्कर भंडारी, भूषण काबरा, सोहम शिंगवी, अरिहंत कोठारी, हर्ष बोरा, यश कासलीवाल, अभिनंदन भंसाली, हर्षल ओस्तावाल, रणजीत अग्रवाल, निरज काबरा, देवांग मेहता, हितेंन मेहता, तुषार चोरडिया, विकास सुराणा, अंपायर चैतन्य खोलगडे आदी उपस्थित होते.

स्पर्धेत ३८ संघांनी यात सहभाग नोंदवला. ४ दिवसांत ११५ सामने झाले. यात ३४२ खेळाडूंनी सहभाग नोंदविला.

स्पर्धेत पुरुष गटात गौरव गुगळे यांना उत्कृष्ट फलंदाज, वेदांत बजाज उत्कृष्ट गोलंदाज तर रोहित शिंगवी यांना मालिकावीर किताब मिळाला. महिला गटात प्राची बोगावत उत्कृष्ट फलंदाज, ऋतुजा बोरा उत्कृष्ट गोलंदाज तर प्रीती पोखरणा यांना मालिकावीर किताब मिळाला. मुलांच्या गटात प्रीतला उत्कृष्ट फलंदाज, केशव भंडारी उत्कृष्ट गोलंदाज तर अर्चित चोरबोले याला मालिकावीराचा किताब मिळाला. अध्यक्ष संदेश मुनोत यांनी स्वागत केले. गौतम भंडारी यांनी आभार मानले.


## जाहीर नोटीस

तमाम लोकास या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की खालील परिरिष्ट वर्णन केलेली प्लॉट मिळकत हि विद्यमान मालक **रमेश गुलाबराव गवळी, रा.केडगाव, ता. नगर, जि. अहिल्यानगर** यांची आहे तरी सदर जाहीर नोटीसीने तमाम लोकांस कळविण्यात येते की सदर प्लॉट मिळकती बाबत कोणतेही साठेखत, खरेदीखत, गहाणखत, इक्वीटेबल मॉरगेज, दान, वारस हक्क, बक्षीस पत्र, मनाई हुकुम, दावा, कोर्ट कारवाई, अन्न, वस्त्र, लीज इ. अगर कोणताही कसलाही प्रकारचा हक्क हितसंबंध असल्यास ही नोटीस प्रसिध्द झाल्यापासुन **सात (७)** दिवसाचे आत योग्य त्या कागदोपत्री व पुराव्या सह खालील पत्त्यावर प्रत्यक्ष आणुन दाखवून आमची खात्री करुन द्यावी. अन्यथा मुदतीत कोणाची कोणतीही हरकत न आल्यास सदर प्लॉट मिळकत ही निर्वेध व निजोखमी आहे असे समजले जाईल व त्यानंतर कोणाचीही कोणतीही तक्रार चालणार नाही त्याची नोंद घ्यावी.

**मिळकतीचे वर्णन** :- डि।। अहमदनगर सब डि।। व तालुका नगरपैकी अ.नगर केडगाव हददीतील तसेच मा.. दुय्यम निबंधक साहेब, अ.नगर यांचे कार्यक्षेत्रातील मौजे **केडगाव येथील सिटी सर्व्हे नं. १९६२ (जुना सर्व्हे नं. ४२४/२/४२६ प्लॉट नं. ४३) याचे क्षेत्रफळ ४८२.०० चौ.मी. यापैकी पश्चिम बाजुकडील प्लॉटचे क्षेत्र २४०.०० चौ.मी. या संपूर्ण प्लॉट मिळकतीबाबत.**

**यांसी चतु:सिमा :-**

पुर्वेस : प्लॉट नं. ४३ पैकी १ /२ भाग,

दक्षिणेस : ४० फुट अंतर्गत रस्ता,

पश्चिमेस : प्लॉट नं. ४४,

उत्तरेस : मोतीनगर रेणुकानगर अंतर्गत रस्ता २० फुट.

येणेप्रमाणे चतु:सिमापुर्वक प्लॉट मिळकत दरोबस्त तदंगभुत सर्व वस्तुसुध्दा व इतर वागणुक वहिवाटीचे हक्कासह वरील मिळकत.

अहिल्यानगर
दि.०४/०२/२०२६

**ॲड. अभिजीत बाळासाहेब आवारी**
**ॲड. सरोजनी प्रदीप साठे (यादव)**
ऑफीस नं. २, तळमजला, पराग बिल्डींग,
जिल्हाधिकारी कार्यालयाशेजारी अहिल्यानगर
मो नं. ९८८१२७१२२४.

## जाहीर नोटीस

तमाम लोकांना या जाहीर नोटीसद्वारे कळविण्यात येते कि, खालील परिशिष्टमध्ये नमुद केलेली मिळकतचे विद्यमान मालक **सौ मनीषा रत्नाकर कुलकर्णी,** राहणार : अरणगांव, तालुका व जिल्हा : अहिल्यानगर (अहमदनगर) या आहेत. सदर मिळकत त्यांनी त्यांचे स्त्रीधन व स्वकष्टार्जित उत्पन्नातून तत्कालीन मालकांकडून खरेदी केलेली आहे व खरेदीच्या तारखेपासून ते सदर मिळकतीचा मालकी हक्क, ताबे, शांततामय कब्जे, वहिवाट करत उपभोग घेत आहे तसेच त्यांना तिची विक्री करणे विल्हेवाट लावणे कायमस्वरूपी साठी तब्दील करणे इत्यादीचा पूर्ण कायदेशीर हक्क व अधिकार असल्याचा त्याचप्रमाणे सदर मिळकत संपूर्णपणे कोणत्याही बोजा विरहित निर्वेद निर्जोखीम अशी आहे असा खात्री व भरवसा विद्यमान मालकांनी आमच्या अशिलांना दिलेला आहे. सदर मिळकत आमचे अशिलांस कायामखुश खरेदी देण्याचा व्यवहार नक्की करून आमच्या अशिलांकडून विसारापोटी रक्कम हि स्वीकारलेली आहे. यदाकदाचित सदर मिळकत आमच्या अशिलास हस्तांतर बाबत कोणचीही कोणतीही तक्रार अगर हरकत असल्यास अथवा सदर मिळकत मध्ये कुणाचेही गहाण, दान, पोटगी, साठेखत, अव्वल जप्ती, मनाई हुकुम, बोजा, कर्ज तारण, कब्जा अथवा इतर कोणत्याही कारणाने हक्क अधिकार, हितसंबंध अथवा अधिकार निर्माण झालेले असल्यास हि नोटीस प्रसिध्द झाल्यापासून ५ (पाच) दिवसाच्या आत खाली दिलेल्या पत्यावर कागदोपत्री पुराव्यानिशी समक्ष भेटून खात्री पटवून द्यावी अन्यथा आमचे अशिल मिळकत खरेदीचा व्यवहार पूर्ण करतील मग कुणाचीही कोणतीही तक्रार चालणार नाही याची कृपया सर्वांनी नोंद घ्यावी. मुद्दामहून कुणाचीही फसवणूक होवु नये म्हणून सदर जाहीर नोटीस प्रसिद्धीस दिली आहे.

**परिशिष्ट - मिळकतीचे वर्णन :** डि ।। अहिल्यानगर (अहमदनगर) सब डी तालुका अहिल्यानगर (नगर) पैकी मौजे अरणगांव येथील बिनशेती खुला प्लॉट मिळकत याचा गट क्रमांक व उपविभाग ४७७/१/७/२ याचे एकूण क्षेत्रफळ ५.०००६ आर.चौ.मी (५००.०६ चौ.मी) बाबत.

**या संपूर्ण मिळकतीच्या चतुर्सीमा पुढील प्रमाणे**

**पूर्वेस :** ९ मीटर रस्ता,

**दक्षिणेस :** प्लॉट याचा गट क्रमांक व उपविभाग ४७७/१/७/१,

**पश्चिमेस :** १५ मीटर रस्ता,

**उत्तरेस :** प्लॉट याचा गट क्रमांक व उपविभाग ४७७/१/७/३

येणेप्रमाणे चतुः सीमा पूर्वक मिळकत यदा कदाचित सदर चतु:सीमा चुकीच्या आढळल्यास रेवेन्यू रेकॉर्ड प्रमाणे असलेल्या चतु:सीमा बरोबरच्या समजण्यात याव्यात. त्यातील सर्व वहिवाट वागणुकीच्या सर्व हक्कांसह, तदंगभुत वस्तूंसह काहीही एक राखून न ठेवता.

**ॲड. एस. एल. आसावा**
दि.०४/०२/२०२६ द्वारा चेंबर नंबर १०९, लॉयर्स चेंबर्स, जुने जिल्हा
अहिल्यानगर (अहमदनगर) न्यायालय आवार, अहिल्यानगर (अहमदनगर)


# आनंदऋषीजी हॉस्पिटल येथे प्रतिबंधात्मक आरोग्य तपासणी ओपीडी सुरू

## अल्प दरात तज्ज्ञ डॉक्टरांच्या उपचार मार्गदर्शनाचा लाभ



नगर – अचानक हार्ट अटॅक, मेंदूचा झटका (स्ट्रोक) किंवा किडनी फेल्युअर झाल्यानंतर अनेक रुग्ण व त्यांचे नातेवाईक एकच वाक्य सांगतात की, आम्हाला काहीच त्रास नव्हता. पण वैद्यकीय वास्तव वेगळे आहे. मधुमेह, उच्च रक्तदाब, हृदयरोग व मेंदूविकार हे आजार अनेक वर्षे शरीरात शांतपणे वाढत असतात. जेव्हा लक्षणे दिसू लागतात, तेव्हा अनेकदा नुकसान झालेले असते. त्यामुळेच नियमित ओपीडी तपासणी महत्त्वाची आहे. यासाठी आनंदऋषीजी हॉस्पिटल येथे प्रतिबंधात्मक आरोग्य तपासणी ओपीडी सुरू करण्यात आली आहे. तीन महिने ओपीडी तपासणी फी ५० रूपये राहील. सकाळी १० ते १ यावेळेत ओपीडी सेवा सुरू आहे. विविध आजारांवर प्रभावी उपचार करणारे तज्ज्ञ डॉक्टर येथे उपलब्ध आहेत. त्यांच्या ओपीडी सेवेचा लाभ घेऊन रूग्णांनी भविष्यातील गंभीर आजार टाळावेत, असे आवाहन करण्यात आले आहे.

म्हणूनच आजच्या काळात उपचारांपेक्षा प्रतिबंधात्मक आरोग्य तपासणी गरज ठरत आहे. मधुमेह असलेले रुग्ण, रक्तदाब असलेले रुग्ण, पूर्वी हार्ट अटॅक, अँजिओप्लास्टी किंवा बायपास झालेल्या व्यक्ती, स्ट्रोक किंवा मेंदूविकाराचा इतिहास असलेले रुग्ण, ४० वर्षांवरील सर्व नागरिकांनी प्रतिबंधात्मक तपासणी आवर्जून करणे अत्यंत महत्त्वाचे आहे: आज तपासणी केली तर उद्याचे गंभीर आजार टाळता येऊ शकतात.

प्रतिबंधात्मक तपासणी म्हणजे केवळ काही रक्ततपासण्या नव्हेत. ती म्हणजे रुग्णाचा आजार, औषधे व तपासण्या एकत्रितपणे तज्ज्ञ नजरेतून पाहणे, भविष्यातील हार्ट अटॅक, स्ट्रोक, किडनी फेल्युअरचा धोका ओळखणे, योग्य औषधे, आहार, व्यायाम व जीवनशैली बदल यांचे वैयक्तिक मार्गदर्शन

पुढील ५–१० वर्षांचे आरोग्य सुरक्षित ठेवण्यासाठी स्पष्ट उपचार आराखडा असते. थोडक्यात आजार झाल्यावरची धावपळ नव्हे, तर आजार होण्याआधीच त्याला थांबवण्याची संधी.

वेळीच तज्ज्ञ सल्ला घेतल्यास डायलिसिस, हार्ट अटॅक व स्ट्रोकचा धोका मोठ्या प्रमाणात कमी होतो, अनावश्यक औषधे टाळता येतात, हॉस्पिटलमध्ये वारंवार भरती होण्याची गरज कमी होते, रुग्णाचे आयुष्य अधिक स्वावलंबी व गुणवत्तापूर्ण राहते

ही तपासणी खर्च नाही नसून ती म्हणजे आरोग्यातील दीर्घकालीन गुंतवणूक आहे. ही गरज ओळखून समाजहितासाठी आनंदऋषिजी हॉस्पिटलने पुढाकार घेत प्रतिबंधात्मक आरोग्य तपासणी ओपीडी सुरु करण्यात आली आहे. या ओपीडीत नेफ्रोलॉजीस्ट डॉ. गोविंद कासट, मधुमेह व उच्च रक्तदाबाशी संबंधित आजार, तसेच किडनी व हृदयरोगांच्या व्यवस्थापनात प्रदीर्घ व सखोल अनुभव असलेले तज्ज्ञ डॉक्टर सेवा देत आहेत.

या ओपीडी मध्ये मधुमेह व उच्च रक्तदाबाचे मूळ कारणांवर आधारित उपचार, दीर्घकालीन गुंतागुंत टाळण्यासाठी उपचार नियोजन, औषधे, आहार, जीवनशैली व नियमित तपासण्या यांचे योग्य संतुलन, आजचा आजार नव्हे तर उद्याचे धोके रोखण्यावर भर देण्यात येतो.

विशेष बाब म्हणजे ही सर्वसामान्यांसाठी परवडणारी सेवा आहे. समाजातील प्रत्येक व्यक्तीला तज्ज्ञ सल्ला मिळावा या उद्देशाने या प्रतिबंधात्मक तपासणी ओपीडीचे शुल्क फक्त ५० रूपये पुढील तीन महिन्यासाठी आहे. सवलतीच्या दरात, उच्च दर्जाची वैद्यकीय सल्लामसलत उपलब्ध असून रूग्णांनी या सेवेचा लाभ घ्यावा असे आवाहन हॉस्पिटलच्या वतीने करण्यात आले आहे. अधिक माहितीसाठी संपर्क : ९४०३१ ८६३८७



श्री गजानन महाराज मंदिरास, धर्मपुरी, निंबळक येथे स्वयंचलित चपाती मशीनचे लोकार्पण करण्यात आले.

# 'श्री गजानन महाराज मंदिरा'साठी स्वयंचलित चपाती मशीनचे लोकार्पण

## लॉरिट्झ नूडसेन कंपनीचा सामाजिक उपक्रम

नगर – धर्मपुरी, निंबळक – औद्योगिक क्षेत्रातील कंपनी लॉरिट्झ नूडसेन यांनी सामाजिक बांधिलकी जपत श्री गजानन महाराज मंदिर, धर्मपुरी येथे स्वयंचलित चपाती बनविण्याचे आधुनिक मशीन अर्पण करून एक आदर्श सामाजिक उपक्रम राबविला आहे. मंदिरात दररोज होणाऱ्या महाप्रसादासाठी हे मशीन अत्यंत उपयुक्त ठरणार असून यामुळे अल्प वेळेत अधिक भाविकांना स्वच्छ, गरम व दर्जेदार अन्नसेवा देणे शक्य होणार आहे.

या उपक्रमाच्या यशस्वी अंमलबजावणीसाठी श्रीकांत गाडे, (मानवी संसाधन प्रमुख) महेश चांडक आणि अविनाश मांडे यांचे योगदान लाभले. त्यांच्या सहकार्यामुळे हा उपक्रम प्रभावीपणे साकार झाला.

मशीनमुळे मंदिरातील स्वयंसेवकांवरील श्रम कमी होणार असून महाप्रसाद व्यवस्थापन अधिक कार्यक्षम होणार आहे.

या कार्यक्रमास लॉरिट्झ नूडसेन कंपनीचे प्लांट हेड लक्ष्मण पूजारी, अमित लाखे, तसेच माजी प्लांट हेड अरविंद पारगावकर आणि माजी प्लांट हेड दिलीप आढाव यांची प्रमुख उपस्थिती होती.

मान्यवरांच्या उपस्थितीत धार्मिक विधी, आरती व महाप्रसादाचा कार्यक्रम भक्तिमय वातावरणात पार पडला.

# भरदिवसा घरात घुसून महिलेचा विनयभंग

नगर – केडगावच्या शाहुनगर भागात एका विवाहितेचा भरदिवसा घरात घुसून विनयभंग केल्याची घटना ३ फेब्रुवारी रोजी दुपारी ४.३० च्या सुमारास घडली आहे. घर उघडे असल्याचा फायदा घेऊन एका व्यक्तीने घरात प्रवेश केला आणि झोपलेल्या पिडीत महिलेचे हात धरून अश्लील वर्तन केले. याप्रकरणी कोतवाली पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

पिडीत महिला राहत्या घरी हॉलमध्ये दुपारी विश्रांती घेत होती. घराचा दरवाजा अर्धवट उघडा होता. यावेळी मागील गल्लीत राहणारा विकी संधू नावाचा तरुण अनधिकृतपणे घरात शिरला. महिलेला कुणीतरी स्पर्श केल्याचे जाणवले, मात्र सासू उठवत असाव्यात या समजुतीने तिने दुर्लक्ष केले. मात्र, अचानक संधू याने तिचे दोन्ही हात पकडले आणि अश्लील मागणी केली.

प्रसंगवधान राखून महिलेने आरडाओरड केली आणि संधूला जोरात धक्का दिला. या गोंधळामुळे आरोपीने घटनास्थळावरून पळ काढला. आरडाओरड ऐकून शेजारी राहणाऱ्या महिला मदतीला धावून आल्या. घटनेची माहिती मिळताच पिडीतेच्या नातेवाईकांनी कोतवाली पोलीस गाठले. पोलिसांनी आरोपी विरुद्ध विनयभंगाचा गुन्हा नोंदवला आहे.

पुढील तपास पोलीस हवालदार गोविंद गोल्हार हे करत आहेत.



## ग्रामदैवत श्री विशाल गणेश मंदिरचे महंत संगमनाथ महाराज यांच्या सन्मान

शहराचे ग्रामदैवत श्री विशाल गणेश मंदिर चे महंत संगमनाथ महाराज यांच्या वाढदिवसानिमित्त देवस्थानच्या वतीने त्यांचा सत्कार करण्यात आला. यावेळी देवस्थानचे अध्यक्ष ॲड. अभय आगरकर, उपाध्यक्ष पंडितराव खरपुडे, सचिव अशोकराव कानडे, पांडुरंग नन्नवरे, रंगनाथ फुलसौंदर, चंद्रकांत फुलारी, विजय कोथिंबीरे, ज्ञानेश्वर रासकर, बापूसाहेब एकाडे, हरिश्चंद्र गिरमे, प्रा.माणिकराव विधाते, संजय चाफे, नितीन पुंड, संजय कोके, मयूर बोचुघोळ, सुरेश नन्नवरे, नामदेव दहीहंडे, गणेश राऊत आदी उपस्थित होते.

# आता घरच्या घरी ड्रायक्लीन!




'व्हर्लपूल कंपनी'ने भारतीय बाजारात वॉशिंग मशीनची खास एक्सपर्ट केअर सीरिज लॉंच केली आहे. यात ओझोन फ्रेश एअर तंत्रज्ञान आहे. कंपनीच्या मते हे मशीन पाणी किंवा डिटर्जंटशिवाय कपडे स्वच्छ करू शकते. काही कपडे पूर्णपणे धुण्याची आवश्यकता नसते. काही काळ परिधान केलेल्या कपड्यांना ओझोन तंत्रज्ञान पाण्याशिवाय पुन्हा ताजे बनवते. यासाठी मशीनमध्ये अंगभूत ओझोनायझर आहे. ते ऑक्सिजनचे ओझोनमध्ये रूपांतर करते. हा ओझोन ड्रममध्ये सोडला जातो. त्यामुळे गंध आणि जीवाणू दूर राहतात. 'ड्राय-क्लीन फॅब्रिक'वर या तंत्रज्ञानाचा वापर करण्यात आला असल्याचे कंपनीचे म्हणणे आहे. चाचणीदरम्यान कोणतेही आकुंचन आलेले नाही किंवा त्यांचा रंग फिकट झाला नाही. कंपनीच्या मते कपडे मशीनमधून काढून थेट परिधान केले जाऊ शकतात. याशिवाय या मशीनमध्ये तुम्ही नियमित कपडेदेखील धुवू शकता.

'व्हर्लपूल एक्सपर्ट केअर रेंज'मध्ये स्टीम वॉश तंत्रज्ञान देखील आहे. यात सिक्सथ सेन्स तंत्रज्ञान आहे. ते लोड आणि फॅब्रिकच्या आधारे ड्रमची हालचाल कस्टमाईज करते. यात कमी पाण्याच्या दाबासाठी शून्य दाब भरण तंत्रज्ञान आहे. मशीन १४०० आरपीएम वर फिरते.


# कॅलिडोस्कोप

# डोळे हे जुलमी गडे

डोळे हा माणसाच्या शरीरातला अत्यंत महत्त्वाचा आणि नाजूक अवयव. दृष्टी नसेल तर सृष्टी पाहता येत नाही. परमेश्वराने माणसाच्या शरीराची रचना करताना प्रत्येक गोष्टीचा नीट विचार केला आहे. आपल्या सर्व अवयवांचं कार्य नित्यनेमाने सुरू असतं. डोळेही सातत्याने कार्यरत असतात. अशा या डोळ्यांबद्दलची रंजक माहिती जाणून घेऊया.



- डोळ्यांच्या विकासाची सुरूवात तब्बल ५५० दशलक्ष वर्षांपूर्वी झाल्याचं सांगितलं जातं. गर्भधारणा होऊन दोन आठवडे उलटल्यानंतर डोळ्यांचा विकास होऊ लागतो.
- भुवयांमुळे कपाळावरचा घाम डोळ्यात जात नाही तर पापण्यांमुळे धूळ आणि घाणीपासून या नाजूक अवयवाचं रक्षण होतं.
- डोळ्यांची रचना अनोख्या पद्धतीने करण्यात आली असून चेहऱ्यावरच्या खोबणीत ते बसवण्यात आले आहेत.
- जन्मापासून मृत्यूपर्यंत बुब्बुळांच्या आकारात कोणताही बदल होत नसला तरी नाक आणि कानांचा आकार मात्र बदलत राहतो.



- माणसाच्या डोळ्याचं वजन एक औंसापेक्षाही कमी असतं.
- डोळ्यांना झालेली जखम खूप लवकर बरी होते.
- दृष्टीशी संबंधित ८० टक्के दोष टाळता येतात किंवा पूर्णपणे बरे होतात.
- मेंदूनंतर डोळा हा शरीराचा सर्वात गुंतागुंतीचा अवयव आहे.
- जगभरातल्या ५५ टक्के लोकसंख्येच्या डोळ्यांचा रंग भूरा आहे.
- जास्त वेळ वाचन केल्याने किंवा सातत्याने कॉम्प्युटर, स्मार्टफोनच्या स्क्रीनवर नजर खिळवल्याने डोळ्यांना थकवा येतो.

# गुलाबी कागदातच का?

भारतामध्ये पिढ्यान् पिढ्या एक गोष्ट अगदी हमखास पाहायला मिळते. ती म्हणजे सोनं किंवा चांदी खरेदी करताना ते गुलाबी कागदात गुंडाळून देणं. लहान शहरांमधील पारंपरिक सोनार असोत किंवा मोठ्या ब्रँडेड ज्वेलरी शोरूम्स, ही परंपरा आजही तशीच सुरू आहे. बहुतांश ग्राहक याकडे केवळ सवय किंवा साधी पॅकिंग पद्धत म्हणून पाहतात.



या गुलाबी कागदामागे शास्त्र, मानसशास्त्र, सुरक्षितता आणि धार्मिक श्रद्धा यांचा अनोखा संगम दडलेला आहे. एखादा सराफ सोन्याची अंगठी, हार किंवा बांगडी फिकट गुलाबी कागदात ठेवून दाखवतो, तेव्हा तो नकळतपणे ग्राहकाच्या डोळ्यांवर आणि मेंदूवर परिणाम करत असतो. तज्ज्ञांच्या मते, हा हलका गुलाबी शेड सोन्याच्या पिवळ्या झगमगाटाला संतुलित करतो. त्यामुळे सोनं फारच पिवळट किंवा भडक न दिसता अधिक रॉयल, क्लासी आणि महागडे वाटते. याच कारणामुळे एखादा दागिना गुलाबी कागदात पाहिल्यावर अधिक आकर्षक भासतो.

मानसशास्त्रज्ञ सांगतात, गुलाबी रंग पाहणाऱ्याच्या मनात 'नवीन, शुद्ध आणि सौम्य' असा भाव निर्माण करतो. त्यामुळे दागिना पाहताना ग्राहकाला एक वेगळाच समाधानाचा आणि विश्वासाचा अनुभव मिळतो. हा गुलाबी कागद फक्त दिसायला सुंदर नसतो, तर तो अत्यंत मऊ असतो. त्यामुळे दागिन्यांची ने-आण करताना त्यावर ओरखडे पडण्याची शक्यता कमी होते. विशेषतः सोनं आणि चांदीसारख्या मऊ धातूंसाठी ही गोष्ट फार महत्त्वाची आहे.

# अजब चोर!

कर्नाटकची राजधानी बेंगळुरूमधील 'इलेक्ट्रॉनिक सिटी' परिसरात चोरीचा एक धक्कादायक प्रकार उघडकीस आला आहे. पोलिसांनी निवासी इमारतींमधून महिलांचे अंतर्वस्त्रे चोरणाऱ्या २३ वर्षीय तरुणाला अटक केली आहे. आरोपी पुरुष महिलांची अंतर्वस्त्रे उचलायचा, ते घालायचा आणि नंतर फोटो काढायचा. त्याने छतावर आणि अंगणात वाळत घातलेली महिलांची अंतर्वस्त्रे चोरली.

एक पुरुष छतावर आणि अंगणात सुकविण्यासाठी लटकवलेल्या महिलांच्या अंतर्वस्त्रांना वारंवार लक्ष्य करत आहे, अशी माहिती पोलिसांना मिळाली होती. तक्रार मिळाल्यानंतर, परिसरात गस्त घालणाऱ्या पोलिसांनी तात्काळ कारवाई केली आणि माहितीची पुष्टी करण्यासाठी घटनास्थळी गेले. सीसीटीव्ही फुटेजदेखील तपासण्यात आले. त्यात संशयिताच्या हालचाली टिपल्या गेल्या. सीसीटीव्ही फुटेज आणि स्थानिक रहिवाशांकडून मिळालेल्या माहितीच्या आधारे पोलिसांनी संशयिताला ताब्यात घेतले.

हा संशयित केरळचा रहिवासी आहे. प्राथमिक तपासात आरोपीच्या मोबाईल फोनमध्ये आढळलेल्या छायाचित्रांमध्ये तो महिलांची अंतर्वस्त्रे परिधान केलेला दिसतो. पोलिसांनी आरोपीच्या घराची झडती घेतली. तिथे महिलांच्या अंतर्वस्त्रांचा मोठा संग्रह जप्त करण्यात आला.



# कोट्यधीश भिकारी



भिकारीमुक्त शहर बनवण्यासाठी इंदूरमध्ये सुरू केलेल्या मोहिमेदरम्यान सराफा परिसरात नियमितपणे भीक मागणाऱ्या मांगीलाल या कुष्ठरोग्याला पोलिसांनी ताब्यात घेतले. त्यानंतर एका आर्थिक नाट्यमय घटनेचा उलगडा झाला.

वर्षानुवर्षे, मांगीलालने मागता भीक मागण्याची कला आत्मसात केली होती. तो कधीही भीक मागत नसे. तो आपल्या चाके लावलेल्या लाकडी फळीवर बसून रहायचा. लोक स्वतःहूनच त्याला पैसे देत असत. केवळ भीक मागण्यातून त्याची दररोजची कमाई ४०० ते ५०० रुपयांच्या दरम्यान होती; पण तपासकर्त्यांच्या मते, खरा धंदा अंधार पडल्यानंतर सुरू व्हायचा. चौकशीदरम्यान, मांगीलालने कबूल केले, की भीक मागून मिळालेले पैसे तो जगण्यासाठी खर्च करत नव्हता, तर ते थेट सराफा बाजारात गुंतवत होता. तो स्थानिक व्यापाऱ्यांना एक दिवसासाठी किंवा आठवड्यासाठी रोख रक्कम कर्ज म्हणून देत असे आणि दररोज संध्याकाळी स्वतः व्याज वसूल करत असे.

अधिकाऱ्यांच्या अंदाजानुसार, त्याने ४ ते ५ लाख रुपये कर्ज दिले असून, व्याजासह दररोज १ ते २ हजार रुपये कमावत होता. गरीब वाटणाऱ्या मांगीलालची संपत्ती चक्रावून टाकणारी आहे. शहराच्या प्रमुख भागांमध्ये त्याच्या मालकीची तीन घरे आहेत. त्यात एक तीन मजली इमारत असून आणि इतर दोन एक मजली घरे आहेत. शिवाय त्याच्याकडे दररोज भाड्याने दिल्या जाणाऱ्या तीन ऑटो-रिक्षा आणि एक मारुती सुझुकी डिझायर कार यांचा समावेश आहे.

अनेक मालमत्तांचा मालक असूनही, त्याला त्याच्या अपंगत्वामुळे पंतप्रधान आवास योजनेअंतर्गत वन बीएचके घर मिळाले आहे. मंगिलालला आता उज्जैन येथील सेवाधाम आश्रमात हलवण्यात आले आहे. त्याच्या बँक खात्यांची आणि मालमत्तांची चौकशी सुरू आहे आणि त्याच्याकडून पैसे घेतलेल्या व्यापाऱ्यांचीही चौकशी केली जाणार आहे. मंगिलाल २०२१-२२ पासून भीक मागत आहे. त्याला सध्या एका निवारागृहात ठेवण्यात आले आहे. त्याच्याबद्दल अधिक माहिती गोळा केली जात आहे, आणि एक संपूर्ण अहवाल तयार करून जिल्हाधिकाऱ्यांना सादर करण्यात आला आहे. पुढील निर्देशानुसार त्यावर कारवाई केली जाईल. या प्रकरणामुळे फेब्रुवारी २०२४ मध्ये सुरू झालेल्या इंदूरच्या भिकारीविरोधी मोहिमेत एक अनपेक्षित अध्याय जोडला गेला आहे. एका अधिकृत सर्वेक्षणानुसार शहरात सुमारे ६,५०० भिकारी असल्याचे आढळून आले आहे. आतापर्यंत, ४,५०० जणांनी समुपदेशनानंतर भीक मागणे सोडले आहे. १६०० जणांची सुटका करून त्यांना पुनर्वसन केंद्रांमध्ये पाठवण्यात आले आहे, आणि १७२ मुलांना शाळांमध्ये दाखल करण्यात आले आहे.




# स्टंटबाज ॲरॉन

व्हिलचेअरवर दिवस काढणाऱ्या व्यक्तींबद्दल आपल्याला सहानुभूती वाटते. अपंगत्वामुळे बऱ्याच जणांना आयुष्यभर व्हिलचेअर जवळ करावी लागते. पण या परिस्थितीचा फारसा बाऊ न करणारे लोकही असतात. ॲरॉन फोथरिंगम अशांपैकीच एक. तरूण मंडळी मोटरसायकलचे स्टंट करतात. ट्रेनच्या दारात उभे राहणारेही चर्चेत असतात. पण ॲरॉन व्हिलचेअरवर बसून स्टंट करतो. तो व्हिलचेअर ३६० अंशात अगदी सहजपणे फिरवतो. अशा कसरती दाखवून त्याने बऱ्याच स्पर्धांमध्ये विजेतेपद पटकावली आहेत. या धाडसी मुलाचे कारनामे बघून आपण आश्चर्यचकित होतो. त्याचं कौतुक करण्यासाठी शब्दही अपुरे पडतात. ॲरॉनचा हा प्रवास अनेकांसाठी प्रेरणादायी ठरू शकतो. पाठीच्या कण्याशी संबंधित दोष घेऊन जन्माला आलेल्या ॲरॉनने जिद्दीने या अपंगत्त्वावर मात केली. सुरूवातीला तो कुबड्या वापरत असे. त्याने वयाच्या आठव्या वर्षापासून व्हिलचेअर वापरायला सुरूवात केली. त्याचा भाऊ बीएमएक्सवर स्टंटबाजी करत असे. त्याच्याकडूनच ॲरॉनला प्रेरणा मिळाली. बीएमएक्स ट्रॅकचा वापर करायला सुरूवात केल्यानंतर त्याने कधीही मागे वळून पाहिलं नाही. त्याने स्टंटबाजीच्या बऱ्याच स्पर्धा गाजवल्या. तो रिॲलिटी शोमध्येही सहभागी झाला होता. त्याने एका मालिकेतही काम केलं. ॲरॉनच्या नावे बरेच विक्रम नोंदवले गेले आहेत.



# जमिनीखालचं गाव

जगभरात अनेक चित्रविचित्र ठिकाणं आहेत. त्यांच्याबद्दल जाणून घेतल्यावर आपले डोळे विस्फारतात. काही ठिकाणं निसर्गाचा चमत्कार असतात तर काही मनुष्यनिर्मित. अमेरिकेतलं असंच एक गाव पर्यटकांच्या आकर्षणाचं केंद्र ठरलं आहे. ते जमिनीखाली वसलं आहे. आपण भुयारी रेल्वे, मेट्रोबद्दल ऐकून आहोत. परदेशात अशा रेल्वे कार्यरत आहेत. पण संपूर्ण गावच जमिनीच्या खाली असणं हा प्रकार भन्नाटच म्हटला पाहिजे. 'सुपाई' असं या जमिनीखालच्या गावाचं नाव! ते जमिनीपासून तब्बल तीन हजार फूट खोल वसलं आहे. जगभरातून दरवर्षी जवळपास ५५ लाख लोक 'सुपाई'ला भेट द्यायला येतात. लोकसंख्या खूप कमी असली तरी पर्यटकांमुळे ते कायम गजबजलेलं असतं. अमेरिकेतल्या 'ग्रँड कॅनियन' जवळच्या हवासू भागातल्या खोल दरीत 'सुपाई' वसलं आहे. या ठिकाणी अवघे २०८ लोक राहतात. अमेरिकेतले मूळ निवासी असणारे 'रेड इंडियन्स' इथले नागरिक आहेत. अमेरिकेसारख्या जागतिक महासत्ता असणाऱ्या देशातलं हे गाव आधुनिक सोयीसुविधांपासून मात्र वंचित आहे. इथे येण्यासाठी बरीच पायपीट करावी लागते किंवा खेचरावर बसून प्रवास करावा लागतो. इकडे एखाद-दुसरं विमानच येतं. अशा या गावात जाण्यासाठी अंगी धाडस आणि इच्छाशक्ती असायला हवी.

# नोकरी अट्टल चोरांसाठी

सध्याच्या काळात नोकरी मिळणं अत्यंत कठीण झालं आहे. भरतीची जाहिरात पाहिली की तरुण-तरुणी लगबगीने अर्ज करतात. प्रत्येकजण आपलं कौशल्य, आवड आणि शिक्षण यांचा विचार करून अर्ज करण्याचा निर्णय घेतो. अशा वेळी वर्तमानपत्रातल्या जॉब्स कॉलममध्ये शोध घेताना एखादा भन्नाट ऑफरवर तुमची नजर पडली तर? ही ऑफर साधीसुधी नाही तर चक्क चोरीची ऑफर आहे. कोणीही शहाणा माणूस सफाईदार चोरांना नोकरी देणार नाही. याबाबतची जाहिरातही कुठे आढळणार नाही. पण लंडनमधल्या एका कंपनीने अशी ऑफर दिली आहे. गंमत म्हणजे नोकरीच्या ठिकाणीच चोरी करायची आहे. चोरी केल्यानंतर प्रतितास ६४ डॉलर मानधन दिलं जाईल. साहेबाच्या देशातल्या कपड्यांच्या दुकानाच्या एका मालकीणबाईने बार्क डॉट कॉमवर ही ऑफर दिली. चोराला प्रत्येक तासाला तिच्याच दुकानात चोरी करावी लागेल, अशी अट घालण्यात आली आहे. तिने असं का बरं केलं असावं? याचं कारण म्हणजे ती दुकानातल्या चोऱ्यांमुळे खूप वैतागली आहे. विशेषतः सुटीच्या काळात दुकानातल्या वस्तू चोरीला जाण्याचं प्रमाण वाढलं. यावर उपाय म्हणून तिने अशी जाहिरात दिली. चोराने चोरी केल्यानंतर त्याच्या कामाची पद्धत जाणून घेतली जाईल आणि त्याप्रमाणे सुरक्षेच्या उपाययोजना केल्या जातील, असं तिचं म्हणणं आहे. दुकानात सीसीटीव्ही कॅमेरे बसवण्यात आले असले तरी चोरीच्या घटना घडतच आहेत. त्याचा सोक्षमोक्ष लावण्याचा तिचा प्रयत्न आहे. आता या नोकरीसाठी किती अर्ज येणार ते पहायचं!



# ...आणि लखपती झाली

भाजी आणायला गेल्यावर सहज म्हणून लॉटरीचं तिकिट काढायचं आणि लखपती व्हायचं ही कल्पनाच किती छान आहे ना! पण प्रत्यक्षात असं कधी घडू शकतं का? अमेरिकेतल्या मेरीलँडची रहिवासी असणाऱ्या वनिस्सा नावाच्या महिलेच्या बाबतीत मात्र असं घडलं. भाजी आणायला गेलेल्या वनिस्साने गंमत म्हणून लॉटरीचं तिकिट काढलं आणि तिचं नशीब उघडलं. झालं असं की कोबी आणायला गेलेल्या वनिसाला रस्त्यात लॉटरीचं दुकान दिसलं. आपणही लॉटरी काढून पाहू, असं तिच्या मनात आलं. तिकिट काढून ती घरी आली. ते स्क्रॅच केल्यानंतर तिला आनंदाच्या उकळ्या फुटल्या. तिने सर्वाधिक रकमेची लॉटरी जिंकली होती. २,२५,००० डॉलर तिला मिळाले होते. ही रक्कम एखाद्या चांगल्या पर्यायात गुंतवण्याचा तिचा विचार आहे. इतकंच नाही तर तिला 'डिस्ने वर्ल्ड' फिरायचं आहे. लॉटरीच्या माध्यमातून एवढी रक्कम जिंकणारी वेनिस्सा एकमेव नाही. जुलैमध्ये एक इसमाला अशीच मोठ्या रकमेची लॉटरी लागली होती. केरळचा व्यावसायिक प्रवीण थॉमसनेही दुबई विमानतळावरच्या ड्युटी फ्री ड्रॉमधून एक दशलक्ष डॉलर जिंकले होते. अशा पद्धतीने मालामाल होण्यासाठी नशीब मात्र जोरावर असायला हवं.



# भाविकांची अडवणूक करणाऱ्या एजंटांवर प्रतिबंधात्मक कारवाई

### उपविभागीय दंडाधिकाऱ्यांनी जारी केले आदेश

शिर्डी – साईबाबा समाधी मंदिर परिसरात दर्शनासाठी येणाऱ्या भाविकांची पिळवणूक थांबवण्यासाठी प्रशासनाने पावले उचलली आहेत. भाविकांची वाहने अडवून त्यांना विशिष्ट दुकानातूनच पूजासाहित्य खरेदी करण्यास भाग पाडणाऱ्या व खासगी पार्किंगचा आग्रह धरणाऱ्या एजंटांवर आता भारतीय नागरिक सुरक्षा संहितेच्या कलम १५२ अन्वये प्रतिबंधात्मक कारवाई करण्यात येणार आहे. याबाबतचे सशर्त आदेश शिर्डी विभागाचे उपविभागीय दंडाधिकारी माणिक आहेर यांनी निर्गमित केले आहेत.

शिर्डीत दररोज देश–विदेशातून लाखो साईभक्त दर्शनासाठी येतात. मात्र, मंदिर परिसर व शिर्डी शहरात अनेक ठिकाणी खासगी व्यक्तींकडून सार्वजनिक रस्त्यावर भाविकांची वाहने बेकायदेशीरपणे अडवली जातात. भाविकांना खासगी पार्किंगच्या ठिकाणी वाहने घेण्याचा आग्रह धरला जातो. तसेच विशिष्ट दुकानांतून अव्वाच्या सव्वा दरात पूजासाहित्य खरेदी करण्यास भाग पाडले जाते. यातून भाविकांची मोठी आर्थिक पिळवणूक होत असल्याच्या तक्रारी प्राप्त झाल्या होत्या. अनेकदा भाविकांना दमदाटी, शिवीगाळ व धक्काबुक्की करण्याचे प्रकारही घडले आहेत. या पार्श्वभूमीवर कायदा व सुव्यवस्था अबाधित राखण्यासाठी प्रशासनाने हे आदेश जारी केले आहेत.

या आदेशानुसार शिर्डी गावाच्या बाहेरील किंवा गावातील सार्वजनिक रस्ते, चौक, बसथांबे व प्रवेश मार्गावर दर्शनासाठी येणाऱ्या भाविकांची वाहने थांबवून त्यांची दिशाभूल करण्यास मनाई करण्यात आली आहे. तसेच कोणत्याही गावातून शिर्डी येथे येणाऱ्या प्रवाशांच्या वाहनांनी विशिष्ट दुकान अथवा आस्थापनेतूनच खरेदी करावी किंवा निवास करावा, असा आग्रह आता धरता येणार नाही. कोणत्याही व्यक्तीने स्वतःला देवस्थान ट्रस्ट किंवा प्रशासनाचा अधिकृत प्रतिनिधी असल्याचे भासवू नये, असेही आदेशात स्पष्ट करण्यात आले आहे.

भोजन, निवास किंवा दर्शनाच्या नावाखाली मध्यस्थीचे व्यवहार करणाऱ्यांवरही निर्बंध लादण्यात आले आहेत. या आदेशाचे उल्लंघन करणाऱ्या व्यक्तींवर भारतीय नागरिक सुरक्षा संहितेच्या कलम २२३ अन्वये कायदेशीर कारवाई करण्यात येईल. या आदेशाने प्रभावित झालेल्या कोणत्याही व्यक्तीला १६ फेब्रुवारी पर्यंत आपली बाजू मांडता येईल, असे प्रशासनाकडून कळवण्यात आले आहे.

# सनातन धर्म सभेतर्फे अजित दादांना अभिवादन

नगर – अहिल्यानगर येथील सनातन धर्म सभेच्या संचालक मंडळाच्या बैठकीत महाराष्ट्राचे उपमुख्यमंत्री स्वर्गीय अजितदादा पवार यांना श्रद्धांजली अर्पण करण्यात आली.

यावेळी संस्थेचे अध्यक्ष वेदमूर्ती महेश रेखे, उपाध्यक्ष निळकंठ देशमुख, मंत्री दिनकर देशमुख, रमेश देशपांडे, विश्वस्त वेदमूर्ती चकोर मुळे, राजेंद्र नगरकर, शिरीष मुळे, खजिनदार ॲड. उमेश नगरकर, डॉ. नंदकिशोर मुळे, समीर उपाध्ये, उदय वेकर, मिलिंद ऋषी, उमेश वाळुंजकर आदी उपस्थित होते.

# अजितदादांच्या स्मरणार्थ १९ ते २३ फेब्रुवारी दरम्यान पारनेर येथे ‘राज्यस्तरीय कृषी प्रदर्शना’चे आयोजन

### ‘कामाच्या माणसाला कामातूनच श्रद्धांजली’ : खासदार निलेश लंके यांची संकल्पना



पारनेर येथे स्व. अजितदादा पवार यांच्या स्मृतीप्रित्यर्थ आयोजित राज्यस्तरीय कृषी प्रदर्शनाच्या माहिती पत्रकाचे अनावरण करताना खा.निलेश लंके आदी.

पारनेर – पारनेर येथे स्व. अजितदादा पवार यांच्या स्मृतीप्रित्यर्थ आणि ‘कामाच्या माणसाला कामातूनच श्रद्धांजली’ या भावनेतून खासदार निलेश लंके यांच्या संकल्पनेतून राज्यस्तरीय कृषी प्रदर्शनाचे आयोजन करण्यात आले आहे. हे कृषी प्रदर्शन १९ ते २३ फेब्रुवारी या कालावधीत पारनेर बाजार समिती शेजारील मैदानावर भरविण्यात येणार आहे. खासदार निलेश लंके यांच्या उपस्थितीत ४ फेब्रुवारी रोजी पारनेर येथे पार पडलेल्या पत्रकार परिषदेत ही माहिती देण्यात आली.

या प्रदर्शनात ट्रॅक्टर, आधुनिक शेती अवजारे, बी–बियाणे, रासायनिक, सेंद्रिय व जैविक खते, औषधे, ठिबक सिंचन, शेततळी, दूध काढणी यंत्रे, कुक्कुटपालन, शेळीपालन, मधमाशी पालन, रोपवाटिका, पशुआहार आदी शेती व शेतीपूरक व्यवसायांशी संबंधित सर्व साहित्य व माहिती उपलब्ध होणार आहे. यासोबतच कांदा व ऊस पिकवाढीबाबत मार्गदर्शन व नव्या ए.आय. तंत्रज्ञानाची माहिती शेतकऱ्यांना देण्यात येणार आहे.

या प्रदर्शनात कृषी विद्यापीठ, जिल्हा व तालुका कृषी विभाग, आत्मा योजना तसेच विविध शासकीय बँकांचे माहितीपर स्टॉल्स असणार असून, शासकीय योजनांचा लाभ व तांत्रिक मार्गदर्शन शेतकऱ्यांना एकाच ठिकाणी मिळणार आहे. प्रदर्शनाचे खास आकर्षण म्हणून जगातील एकमेव आणि गिनीज बुक ऑफ वर्ल्ड रेकॉर्डमध्ये नोंद झालेली अवघी २ फूट ८ इंच उंचीची ‘राधा’ ही जगातील सर्वात बुटकी म्हैस पाहण्यासाठी उपलब्ध असणार आहे.

महिलांसाठी गृहोपयोगी वस्तूंची दालने, लहान मुलांसाठी किड्स झोन तसेच सांगली, कोल्हापूर व कोकण भागातील प्रसिद्ध खाऊ गल्लीचे स्टॉल्सही या ठिकाणी असणार आहेत. या राज्यस्तरीय कृषी प्रदर्शनाचा लाभ पारनेर तालुक्यासह अहिल्यानगर, श्रीगोंदा, शिरूर व जुन्नर तालुक्यातील शेतकरी बांधवांना होणार असून, सर्व शेतकरी, नवउद्योजक तरुण व महिलांनी या कृषी प्रदर्शनाचा लाभ घ्यावा, असे आवाहन आयोजकांच्या वतीने करण्यात आले आहे.

प्रदर्शनात प्रगतिशील आदर्श शेतकरी, आदर्श शिक्षक, आदर्श उद्योजक,सामाजिक कार्यकर्ते, आदर्श सरपंच, आदर्श दुधडेअरी, आदर्श सहकारी सोसायटी हे पुरस्कार यावेळी प्रदान करण्यात येणार आहेत. तर प्रदर्शनाला भेट देणाऱ्या शेतकरी बांधवांसाठी खास दर एक तासाला लकी ड्रॉ आयोजीत करणार आहोत. या प्रदर्शनाचे यशस्वी नियोजन गेल्या ११ वर्षांपासून महाराष्ट्रात कृषी प्रदर्शनांचे आयोजन करणाऱ्या पी.जे.एम. इव्हेंट मॅनेजमेंट, काष्टीचे बंडू पाचपुते व गणेश जठार यांनी केले आहे. यावेळी निलेश लंके प्रतिष्ठानचे कार्यकर्ते आदी उपस्थित होते.

# श्री बाणेश्वर महाविद्यालयात कॅम्पस ड्राईव्हचे आयोजन



श्री बाणेश्वर महाविद्यालयात कॅम्पस ड्राईव्हचे आयोजन करण्यात आले होते.

नगर – श्री बाणेश्वर कला विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय, बुऱ्हाणनगर, अहिल्यानगर येथे ३१ जानेवारी रोजी प्लेसमेंट सेल व IQAC विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने कॅम्पस रिक्रुटमेंट प्रोग्रामचे आयोजन करण्यात आले होते.

महाविद्यालयात आयोजित कॅम्पस मुलाखतीसाठी Altruist Technology Pvt. Ltd विमाननगर, पुणे कंपनीचे एच.आर गणेश आव्हाड, श्रीमती प्रणाली वडजे, श्रीमती जयश्री आव्हाड, सुरज पाटील, अविनाश पाचपुते उपस्थित होते. कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान महाविद्यालयाचे प्राचार्य डॉक्टर व्ही. एम जाधव यांनी भूषविले.

कंपनीचे एच आर गणेश आव्हाड यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना रोजगाराची सुवर्णसंधी उपलब्ध होणार असल्याचे प्रतिपादन केले. तसेच सद्यस्थितीतील उपलब्ध नोकरीच्या संधी बाबत मार्गदर्शन केले तसेच घाव सोसल्याशिवाय देव पण येत नाहीया म्हणीप्रमाणे योग्य उदाहरणाद्वारे विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले.

तसेच महाविद्यालयाचे प्राचार्य डॉक्टर व्ही.एम. जाधव यांनी मार्गदर्शन करताना जास्तीत जास्त विद्यार्थ्यांनी मुलाखतीस सहभाग नोंदवावा असे आवाहन केले.

याप्रसंगी महाविद्यालयाचे IQAC कॉर्डिनेटर डॉ. शेख एच आर, परीक्षा विभाग प्रमुख डॉ. बी एम मुळे तसेच महाविद्यालयातील विद्यार्थी शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते. मुलाखतीसाठी १०७ विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदवला.

कॅम्पस मुलाखती द्वारे महाविद्यालयातील एकूण ५८ विद्यार्थ्यांची निवड करण्यात आली.

श्री बाणेश्वर शिक्षण संस्थेचे संस्थापक संचालक अक्षय कर्डिले यांनी निवड झालेल्या विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले तसेच महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ व्हि. एम जाधव यांनी विद्यार्थ्यांचे कौतुक केले व कंपनीच्या अधिकाऱ्यांचे आभार मानले.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. भस्मे ए. बी यांनी केले तसेच प्राध्यापक तिवारी एम. एन यांनी मान्यवरांचा परिचय करून दिला तसेच कार्यक्रमाचे रूपरेषा सांगून प्रस्ताविक केले. तसेच प्रा. शेलार एस. एस यांनी आभार मानले. प्लेसमेंट सेल कमिटी चेअरमन प्राध्यापिका मोहिते मॅडम, तसेच कमिटी सदस्य प्रा. वाघ मॅडम, प्रा. दिवटे मॅडम यांच्या मार्गदर्शनानुसार कार्यक्रम कार्यक्रम पार पडला.

# कॅम्प पोलीस स्टेशन हद्दीतील गुन्हेगारांची टोळी केली हद्दपार

नगर – भिंगार कॅम्प पोलीस स्टेशन हद्दीतील मुकुंदनगर परिसरातील सराईत गुन्हेगारांची टोळी १ वर्षांसाठी जिल्ह्यातून हद्दपार करण्यात आली आहे. पोलिस अधिक्षक सोमनाथ घार्गे यांनी याबाबतचे आदेश काढताच पोलिसांनी या टोळीला ताब्यात घेत जिल्ह्याबाहेर नेवून सोडले आहे.


नाजीश उर्फ नन्या साजीद सय्यद (रा. वाबळे कॉलनी, मुकुंदनगर), असद इरफान सय्यद (वय २७, रा.हमीद पार्क, मरीयम मस्जिद जवळ, मुकुंदनगर), अफनान उर्फ अप्पु आदील शेख (वय २१, रा. वाबळे कॉलनी मुकुंदनगर) तसेच दानिश उर्फ धन्या फारुख शेख (वय २७, रा. जुनी घासगल्ली तांबटकर गल्ली, तेलीखुंट) अशी हद्दपार केलेल्या गुन्हेगारांची नावे आहेत.

भिंगार कॅम्प पोलीसांनी गुंड/गुन्हेगार यांचा अभिलेखावरुन हदपार प्राधिकरण तथा पोलीस अधीक्षक अहिल्यानगर यांना महाराष्ट्र पोलीस कायदा कलम ५५ प्रमाणे टोळी हददपार प्रस्ताव सादर केला होता. या प्रस्तावानुसार चौघांना एक वर्षाकरीता हददपार केले बाबतचा आदेश पोलीस अधीक्षक सोमनाथ घार्गे यांनी आदेश पारीत केल्याने मुकुंदनगरच्या तिघा हददपार इसमांना ३ फेब्रुवारी रोजी तात्काळ ताब्यात घेवुन अहिल्यानगर जिल्हयाचे सरहद्दीचे बाहेर सोडण्यात आले आहे.

सदरची कारवाई पोलीस अधीक्षक सोमनाथ घार्गे, अप्पर पोलिस अधिक्षक वैभव कलुबर्मे, शहर विभागाचे उपअधिक्षक डॉ. दिलीप टिपरसे यांचे मार्गदर्शनाखाली स. पो. नि. जगदीश मुलगीर, पोलीस अंमलदार अहमद इनामदार, इसराईल पठाण, रवि टकले, प्रमोद लहारे, रेखा पुंड, किरण बर्वे, स्थानिक गुन्हे शाखेचे रविंद्र पांडे, राम माळी यांनी केली आहे.

# श्री क्षेत्र गोरक्षनाथ गड देवस्थान कलशरोहण कार्यक्रमानिमित्त ८ फेब्रुवारीला नियोजन बैठक

### भक्तांनी उपस्थित राहावे : अध्यक्ष ॲड. शंकरराव कदम यांचे आवाहन



नगर – आदर्श गाव म्हणून ओळखले जाणारे मांजरसुंबा येथील श्री क्षेत्र गोरक्षनाथ गड देवस्थान मंदिराच्या कलशरोहण व लोकअर्पण सोहळ्याचे ७ मार्च रोजी आयोजन करण्यात आले आहे. या धार्मिक सोहळ्याच्या पार्श्वभूमीवर नियोजन बैठक ८ फेब्रुवारी रोजी दुपारी १२ वाजता देवस्थान परिसरात आयोजित करण्यात आली आहे.

कलशरोहण सोहळ्याच्या निमित्ताने परिसरातील गावांमध्ये तीन ते चार दिवस कलशाची धार्मिक मिरवणूक काढण्यात येणार आहे.

या मिरवणुकीत नाथसंप्रदायाचे अनुयायी, वारकरी, स्थानिक भक्त, तसेच गावातील महिलांचा सहभाग असणार आहे. पारंपरिक टाळ–मृदुंग, भजन–कीर्तन आणि गजरांनी वातावरण भक्तिमय होईल, अशी माहिती देवस्थानकडून देण्यात आली आहे.

कलशरोहण सोहळ्यापूर्वी तीन दिवसांचे हरिनाम सप्ताह, प्रवचन व कीर्तन कार्यक्रम आयोजित करण्याचे नियोजन करण्यात आले आहे.

या कार्यक्रमांत विविध कीर्तनकार, ह.भ.प., आणि स्थानिक संतभक्त सहभागी होणार असून श्री गोरक्षनाथ महाराजांच्या कृपेने गावात भक्ती, शांती आणि एकतेचा संदेश दिला जाणार आहे.

या संदर्भात श्री गोरक्षनाथ देवस्थान ट्रस्टचे अध्यक्ष ॲड. शंकरराव कदम यांनी सांगितले की, कलशरोहण सोहळा हा आपल्या सर्वांच्या श्रद्धेचा विषय आहे. या कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी सर्व भक्त, ग्रामस्थ, आणि कार्यकर्त्यांनी नियोजन बैठकीस उपस्थित राहून मार्गदर्शन करावे व सहकार्य करावे.

गोरक्षनाथ महाराजांच्या आशीर्वादाने आपण सर्वजण हा ऐतिहासिक सोहळा यशस्वी करू.

# कायरोप्रॅक्टीक व मसाज; ‘शरीराला अनेक फायदे’

नगर – शारिरीक संरेखन (Body Alignment) व मसाज केल्याने स्नायुंच्या वेदना दूर होतात व मजबुत होतात. रक्तप्रवाह सुरळीत होतो त्यामुळे ब्लड प्रेशरची समस्येपासून दूर राहणे शक्य होते, मसाजने शांत झोप लागण्यास मदत होते त्यामुळे डोळ्याचे आरोग्य उत्तम राहण्यासोबतच डोळ्यांची दृष्टी वाढवण्यासाठीही मदत होते तसेच त्वचा चमकदार आणि तजेलदार होते. शरीराला ऊर्जा मिळते व शरीर सुदृढ होते. शरीराची रोगप्रतीकार शक्ती वाढते. ट्रेस आणि टेन्शन जाते. मसाज नॅचरल पेन रीलिव्हर आहे त्यामुळे मसल्स रिलॅक्स व मजबुत होतात. डोकेदुखी, अंगदुखी पासून भरपूर आराम मिळतो, ज्या लोकांचे वजन जास्त आहे त्या लोकांनी नियमीत मसाज केल्याने बॉडीचे एक्स्ट्रा फॅट बर्न होते. लठ्ठपणा दूर करण्यात मदत मिळते, मसाज केल्याने मसल्सचा स्टिफनेस दूर होतो. बॉडीमध्ये लवचिकता वाढते त्यामुळे शरीराची हालचाल वाढते. शरीराची हालचाल वाढल्यामुळे मेहनत करण्याची इच्छा होते व मेहनतीमुळे अन्न पचते. चांगली झोप येत. नियमीत मसाज केल्यास स्किन हेल्दी आणि ग्लोइंग बनते, रंग उजळतो, सुरकुत्यांपासून बचाव होतो. मसाजमुळे आतड्यांची क्षमता सुधारते, शरीरातील टाक्सीन निघुन जाते. पचनक्रिया सुधारते.

### मानेच्या मणक्याचे (सर्व्हयकल स्पाँडीलायसिस)

मानेपासून हातापर्यंत मुंग्या येणे, हातामध्ये वेदना होणे, हात वर न होणे, डोकेदुखी होणे, सकाळी उठल्यानंतर १० मिनिट खूप मान दुखणे, मणक्यात गॅप होणे, मणक्याची गादी सटकणे, मानेच्या हालचालीनंतर चक्कर येणे.

### पाठीच्या मणक्याचे दुखणे (थोरेंसिक स्पॉडीलायसिस)

खाली वाकता न येणे किंवा खाली वाकताना पाठ दुखणे, बसताना व उठताना पाठ दुखणे, पाठीपासून छातीपर्यंत दुखणे, कमरेचे मणक्याचे दुखणे

### (लम्बर स्पाँडीलायसिस)

कंबरेत सारखे दुखणे, उठताना व बसताना त्रास होणे, गाडी चालविताना कंबर दुखणे, कमरेत वाकडेपणा येणे, पाय बधीर होणे, पायाला मुंग्या येणे, कमरेच्या मणक्याची गादी (कुर्चा) सरकणे, कमरेपासून पाय दुखणे (सायटिका) पायाची पिंढरीमध्ये खूप वेदना होणे.

### गुडघ्याचे दुखणे (ऑस्टिहो अर्तराईटीस)

गुडघ्यात दुखणे, पाय वाकडा होणे, गुडघ्यात गॅप होणे, उठताना–बसताना आवाज येणे व वेदना होणे, मांडी घालून बसता न येणे, चालताना असहायपणा जाणवणे.

### कोनीचे दुखणे (टेनिस एलबो)

तसेच हुक भरणे, लचक भरणे, पॅरालाईसेस व इतर हाडांचे आजारावर उपचार केले जातील.

### पोटांचे आजार

नळ फुगणे, गॅस होणे, पोटात दुखणे, ॲसिडीटी होणे, मळमळ होणे, अपचन होणे.

पारंपारिक व शास्त्रोक्त कायरोप्रॅक्टीक मसाज, ॲक्युप्रेशर थेरपीद्वारे विना ऑपरेशन, विना औषध व वेदनारहित नैसर्गिकरित्या गुणकारी उपचार करुन अनेक रुग्णांना फायदा झालेला आहे. तरी इतरत्र उपचार करुन निराश झालेल्या रुग्णांनी एक वेळ अवश्य भेटावे. व आपली निराशा टाळावी. गेल्या अनेक वर्षापासून फरीद बापू हे खालील पत्त्यावर कार्य करीत आहेत. कायमचा पत्ता : बी – ११४ (बेसमेंट) प्रेरणा आर्केड, डॉ. कथुरियाच्या समोर, तारकपूर बस स्टॅण्ड समोर, अहमदनगर वेळ सकाळी ८ ते दुपारी ४ वाजेपर्यंत. महिला मसाजसाठी महिला मसाजिस्ट उपलब्ध, येण्यापुर्वी फोन करणे आवश्यक. मो.नं. ९०१११९३३७१.

# नगरचा नावलौकिक महाराष्ट्रात उंचावण्यात प्रा. संजय धोपावकरांचा सिंहाचा वाटा आहे

### जिल्हा क्रीडा अधिकारी ज्ञानेश्वर खुरांगे यांचे प्रतिपादन, सारडा महाविद्यालयाचे प्रा.संजय धोपावकर यांचा क्रीडा क्षेत्रातील योगदानाबद्दल सेवापुर्ती निमित्त विशेष गौरव


हिंद सेवा मंडळाच्या सारडा महाविद्यालयात वरिष्ठ महाविद्यालयाचे शारीरिक क्रीडा संचालक प्रा.संजय धोपावकर यांच्या सेवापूर्ती समारंभ निमित्त महाविद्यालयाच्या वतीने सन्मानचिन्ह देऊन प्राचार्या माहेश्वरी गावित यांच्या हस्ते विशेष गौरव करण्यात आला. याप्रसंगी जिल्हा क्रीडा अधिकारी ज्ञानेश्वर खुरांगे, सौ.पद्मजा धोपावकर

नगर – अहिल्यानगर जिल्ह्यात २५ ते २७ शिवछत्रपती पुरस्कार खेळाडू घडले आहेत. त्यापैकी सहा शिवछत्रपती पुरस्कार खेळाडू क्रीडा शिक्षक प्रा.संजय धोपावकर यांनी घडविले आहेत. एक छत्रपती पुरस्कार मिळविण्यासाठी खेळाडूला अनेक राष्ट्रीय स्पर्धेत पदके मिळवावी लागतात. तसेच आंतरराष्ट्रीय स्तरावर कामगिरी करावी लागते. असे सहा पुरस्कार ज्युदो खेळामध्ये त्यांनी घडविले आहेत. क्रीडाक्षेत्राची सेवा केल्याने कुठल्याही प्रकारचे उत्पन्न व नफा मिळत नाही. सेवाभावदृष्टी डोळ्यासमोर ठेवून श्री.धोपावकर यांनी क्रीडा क्षेत्रात महत्त्वपूर्ण योगदान दिले आहे. क्रीडा क्षेत्रात यशस्वी नागरिक घडविण्याचे काम क्रीडा शिक्षक करीत असतात. अनेक राज्यस्तरीय राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय खेळाडू त्यांनी घडविले आहेत. त्याचाच परिपाक म्हणून एवढा मोठा परिवार श्री.धोपावकर यांनी जमविला आहे. क्रीडा क्षेत्रातील अहिल्यानगरचा नावलौकिक महाराष्ट्रात उंचावला आहे. यामध्ये क्रीडा शिक्षक प्रा.संजय धोपावकर यांचा सिंहाचा वाटा आहे, असे प्रतिपादन जिल्हा क्रीडा अधिकारी ज्ञानेश्वर खुरांगे यांनी केले आहे.

हिंद सेवा मंडळाच्या सारडा महाविद्यालयात वरिष्ठ महाविद्यालयाचे शारीरिक क्रीडा संचालक प्रा.संजय धोपावकर यांच्या सेवापूर्ती समारंभ निमित्त महाविद्यालयाच्या वतीने सन्मानचिन्ह देऊन प्राचार्या माहेश्वरी गावित यांच्या हस्ते विशेष गौरव करण्यात आला. याप्रसंगी जिल्हा क्रीडा अधिकारी ज्ञानेश्वर खुरांगे, सौ.पद्मजा धोपावकर, धनंजय, विजय, अजय, अमोल धोपावकर, उपप्राचार्य मिलिंद देशपांडे, प्रबंधक अशोक असेरी, पर्यवेक्षक डॉ.राजु रिक्कल, एम.आर. कुलकर्णी, डॉ.कुमावत, डॉ.महेश मुळे, किशोर गांधी, ॲड.शेलोत, प्रा.जोशी सर, प्रा.दिलीप कर्डिले, संतोष वाबळे मार्गदर्शक, अहिल्यानगर जिल्हा ऑलिंपिक असोसिएशनचे सचिव शैलेश गवळी, प्राध्यापक वृंद व प्राध्यापकेतर कर्मचारी, प्रा.संजय धोपावकर यांचा मित्रपरिवार व नातेवाईक, विद्यार्थी उपस्थित होते.

प्राचार्या डॉ.माहेश्वरी गावित म्हणाल्या, क्रीडा शिक्षक संजय धोपावकर यांचे क्रीडा क्षेत्रात मोठे योगदान आहे. महाविद्यालयातील क्रीडा विभागाचे कार्य उत्कृष्ट असल्याने तीन वेळा नॅकचा अ दर्जा मिळाला. नॅकच्या प्रक्रियेत क्रीडा विभागच दाखवावा लागला. या क्रीडा विभागाचे नेतृत्व क्रीडा शिक्षक प्रा.संजय धोपावकर यांनी केले आहे. माजी प्राचार्य अनिल सहस्त्रबुद्धे यांच्या कार्यकाळात पुणे विद्यापीठात निर्भय कन्या अभियान नव्याने हा उपक्रम राबवायचा होता. या उपक्रमाची मांडणी श्री.धोपावकर यांनी केली होती. या उपक्रमा मुळे सारडा महाविद्यालयातील मुली मोठ्या प्रमाणात खेळात सहभागी झाले आहेत. निर्भय कन्या हा उपक्रम आजही सारडा महाविद्यालयात सुरू आहे.

त्यातील दोन मुलींना शिवछत्रपती पुरस्कार देखील माझ्या कार्यकाळात मिळाला आहे. श्री.धोपावकर यांचे अनेक विद्यार्थी राज्यस्तरीय, राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय पातळीवर खेळतात. विद्यार्थी हे त्यांच्यासाठी दैवत आहेत. तेच विद्यार्थी त्यांना दैवत मानतात.

डॉ.गिरीश कुलकर्णी म्हणाले, प्रा.संजय धोपावकर यांनी क्रीडा विश्वात वशिलेबाजी न करता उत्तम गुणवत्ता असणाऱ्या खेळाडूंची नेहमीच शिफारस प्रामाणिकपणे केली आहे. त्यामुळे त्यांचा विश्वासार्ह क्रीडा संघटक म्हणून जिल्ह्यात नावलौकिक आहे.

सत्काराला उत्तर देताना प्रा.संजय धोपावकर म्हणाले, कॉलेजमध्ये शिकत असताना दिनुभाऊ कुलकर्णी यांचे मार्गदर्शन लाभले. ज्या महाविद्यालयात खेळाडूंना व खेळाला महत्व दिले जाते. त्या ठिकाणी नोकरी मिळाली हे मी माझे भाग्य समजतो. क्रीडा क्षेत्रात प्रतिकूल परिस्थितीत अनेक खेळाडू घडविण्याची संधी मिळाली आहे. यासाठी महाविद्यालयातील सहशिक्षकांचे व प्राचार्यांचे वेळोवेळी सहकार्य मिळाले आहे. क्रीडा क्षेत्रात काम करीत असताना अनेक खेळाडूंना न्याय देण्याचा प्रयत्न केला आहे.

प्रास्ताविक व स्वागत प्रा.संजय साठे यांनी केले. सूत्रसंचालन प्रा.निनाद बेडेकर यांनी केले. प्रा.साईनाथ थोरात यांनी आभार मानले. कार्यक्रमाचे यशस्वीतेसाठी प्रा. संजय साठे, प्रा.साईनाथ थोरात, प्रा.अक्षय कर्डिले, प्रा.अतुल कुलकर्णी, नंदू मामा व खेळाडूंनी परिश्रम घेतले.

### दादोजी कोंडदेव पुरस्कारासाठी शासनाकडे प्रस्ताव पाठवावा

सहा शिवछत्रपती पुरस्कार मिळवणारे खेळाडू प्रा.संजय धोपावकर यांनी घडविले आहेत. तरी देखील शासनाने त्यांना क्रिडा पुरस्कार दिला नाही. ही खंत सर्व क्रीडाप्रेमींना वाटत आहे. पुरस्कार मिळावा म्हणून श्री.धोपावकर यांनी शासनाकडे कोणताही प्रस्ताव पाठविलेला नाही. क्रीडा क्षेत्रातील अतुलनीय योगदानाबद्दल त्यांना दादोजी कोंडदेव पुरस्कार मिळावा. ही क्रीडा प्रेमींची इच्छा आहे. या पुरस्कारासाठी क्रीडा शिक्षक प्रा.संजय धोपावकर यांनी प्रस्ताव पाठविण्याची आवश्यकता आहे. आपण प्रस्ताव पाठवा, पुरस्कार शंभर टक्के शासनाकडून आपणास मिळेल. तुमचे क्रीडा क्षेत्रातील योगदान मोठे आहे. राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय अनेक खेळाडू आपण घडविले आहेत. आपणास पुरस्कार मिळावा यासाठी शासनाकडे पाठपुरावा करू, असे जिल्हा क्रीडा अधिकारी ज्ञानेश्वर खुरांगे यांनी सांगितले आहे.

